# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५२**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ९ / डिसेंबर २००१

## संपादकीय

डिसेंबर महिना, उजाडला आणि एकविसाव्या शतकातले पहिले कॅलेंडर वर्ष संपले याची जाणीव व्हायला लागली. वहातो ही दुर्वांची जुडी या नाटकात कै. बाळ कोल्हटकर यांची एक सुरेख कविता आहे. त्यातील ओळी आठवल्या,

*वर्षामागुनि वर्ष चालली*
*परि किनारा मिळेना ...*

या घाई गर्दीच्या, कार्यक्रम, सभा संमेलनांनी व्यापलेल्या डिसेंबरच्या निमित्ताने अंर्तमुख होऊन विचार करावासा वाटतो. संपणाऱ्या या एका वर्षात आणि अशा अनेक वर्षात आपण काय केलं... काय मिळवलं ... हे प्रश्न मनात उमटत रहातात. त्याचबरोबर पुढं उगवणाऱ्या नवीन वर्षाच्या निमित्ताने स्वप्नांची जुळवाजुळव ही चाललेली असते. या वर्षी राहिलेली, न जमलेली कामे पुढील वर्षावर आपण आखत राहतो. या अंर्तमुख करणाऱ्या महिन्याचं स्वरूप त्यामुळेच संधिकालासारखं असतं.

दिशाच्या संदर्भात जेव्हा अ तापर्यंतच्या वाटचालीचा विचार मनात येतो, तेव्हा जाणवत ते असं की परिसरातील, शहरातील अनेक वाचक लेखकांशी दिशा च्या माध्यमातून संबंध जोडले. अतिशय विविध विषयांवर वैचारिक साहित्य मिळविण्याचा ते आपणासमोर ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. वैचारिक, साहित्यांची वानवा असणाऱ्या आजच्या संदर्भात सातत्याने हे काम करणं हे आव्हानच आहे. तरीही प्रयत्न चालू आहेत, चालू राहतील.

दिशासाठी लेखन सहकार्य देऊन, वर्गणी भरून, जाहिरात देऊन आपण सहकार्य करावे असे आवाहन आम्ही नेहमी करतो. लेखनाच्या निमित्ताने अभ्यास व्हावा, विचार मंथन व्हावे हा त्यामागे उद्देश असतो. पुढील वर्षाच्या पार्श्वभूमीवर या आवाहनाचा आपण विचार करावा अशी पुनश्च विनंती आहे.

दिशाच्या सर्व अंकांची सूची बनविली गेली आहे. अभ्यासकांनी तिचाही वापर करावा असे वाटते.

पुढील वर्षी अधिक चांगले, अधिक दर्जेदार साहित्य दिशाच्या माध्यमातून यावं असा जो प्रयत्न आहे तो आपल्या सहकार्यानेच चालू राहिल. त्यासाठी येणारे वर्ष आपणास लेखन-वाचनाचे जावो अशा शुभेच्छा !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक १ / डिसेंबर २००१ किंमत रु. २०/-

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टर्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | काल-काम-वेग | सुरेश देशपांडे | ३ |
| २) | आजचे ग्रामीण साहित्य : ग्रामीण किती-नगर किती ? | अभिजित ब्रम्हनाथकर | ५ |
| ३) | यशवंतराव चव्हाण खरे स्मारक : य.च.म. मुक्त विद्यापीठ नाशिक | प्राचार्य अशोक प्रधान | १० |
| ४) | अंधश्रद्धा | सौ. वंदना प्रसादे | १४ |
| ५) | आठवणीतील कवितांच्या आठवणी | कु. क्षमा वैद्य | १६ |
| ६) | खूप सुट्यांमुळे देशाच्या प्रगतीत अडथळा निर्माण होतो. | श्रीकांत धनपुणे | ३१ |
| ७) | भ्रष्टाचारापासून भारत मुक्त होईल का ? | योगेश रविंद्र लकेश्री | ३२ |
| ८) | शिक्षण व अध्यात्म | श्री. अ. वि. सहस्त्रबुद्धे | ३४ |
| ९) | "कठउपनिषद अर्थात नचिकेत आख्यान" | डॉ. सौ. गीता कुलकर्णी | ३६ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३८ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# काळ-काम-वेग

काळ काम वेग या संकल्पनांचा अर्थ काळाच्या ओघात बदलला आहे. बदलत्या संदर्भात सदर विचार करणारा हा लेख. - संपादक

काळ-काम-वेग हे शब्द कानावर पडताच आपणाला जुन्या काळातील गणितं आठवतात. उदाहणार्थ : एक काम करायला १५ मजूरांना ३० दिवस लागतात, तर तेच काम करायला २० मजूर लावले तर किती दिवस लागतील ? हे गणित सोडवायला लागत नाही हल्ली ! त्याचे उत्तर दिलेल्या चार पर्यायामधून तुम्हाला शोधावे लागते. आणि आता संगणक हाताशी असल्याने, काळावर, कामावर आणि शेवटी वेगावर सुध्दा मात करुन काही सेकंदात तुम्हाला इच्छित उत्तर मिळते. क्षणार्धात इकडची दुनिया तिकडे होऊ शकते . तोंडात बोट घालायच्या आत, तुम्हाला एखादे निसर्गरम्य दर्शन होऊ शकते. तसेच रिमोट कंट्रोलच्या सहाय्याने हे सुंदर जीवन एका क्षणात नष्ट पण होऊ शकते. या काळाच्या वेगाची आपण कल्पनाच करू शकत नाही. मानवी बॉम्बेद्वारे होणारा संहार, किंवा नुकतेच विमाने अपहरण करुन, अमेरिकेसारख्या, बलाढ्य, सर्वसंपन्न, अतिप्रगत राष्ट्रालासुध्दा आश्चर्यचकित करून ' वर्ल्ड-ट्रेड-सेंटर ' च्या इमारतीवर विमाने कोसळवून त्या इमारतीचा चक्काचूर झालेला आपण सर्वांनी दूरदर्शनवर प्रत्यक्ष परवसल्या बघितला. या आधुनिक काळाची आणि त्याचबरोबर अतिप्रचंड ' वेगाची ' महति काय वर्णावी ?

इतक्या झपाट्याने ' काम ' उरकून, पुन्हा कुठलाही पुरावासुध्दा मागे न ठेवता हा सर्वनाश करणारा ' काळ ' ! त्याच्या उदरात काय दडले आहे ! हे देवच जाणो !! असा हा ' काळाचा ' महिमा अगाध आहे. आणि कामाचा वेग प्रकाश किरणांपेक्षांसुध्दा गतिमान आहे. असेच म्हणावे लागेल. आज आपण संगणकाच्या युगात जीवन जगत आहोत. त्याच्या संदेशप्रणालीचा वेगही आपण पहात आहोत. रोजच्या रोज त्याची प्रणाली आणखीनच सुधारणा करत प्रभावी पणे कार्यरत आहे. ह्याचे प्रत्यंतर आपण Internet वरून रोज बघत आहोत. तुम्हाला काय हवे आहे ? त्याची आज्ञा करा ! तो विनातक्रार ते तुम्हाला काही सेकंदातच तुमच्या समोर आणून टाकेल. Your demand will be fulfilled if you command. अरेबियन नाइट्स मधल्या सुरस कथा ! त्यातला जादूचा दिवा म्हणजेच आजचा संगणक आहे. या संगणकाद्वारे हजारो मैलावर असलेल्या आपल्या माणसाची .. खुशाली इ-मेल-इंटरनेटद्वारा आपल्याला बसल्याबसल्या कळते. अशा संगणकाचा उपयोग करून आपल्याकडे शस्त्रक्रिया सुध्दा करतात. इतकी प्रगत व्यवस्था या जादूच्या दिव्यात म्हणजेच संगणकात आहे. फक्त तो गतिमान करून त्याला कमांड (आदेश) करणे आणि त्याच्याकडून कामे करून घेणे हे मात्र माणसाच्या बुध्दिमत्तेवर अवलंबून आहे.

जसे पूर्वी ' यंत्र हे शाप की वरदान ' या विषयावरील आपण वाद-चर्चा घडवून आणायचो. परंतु हे खरोखरीच वरदान आहे हे आता यंत्रानेच सिध्द करून दाखवले आणि हजारो विणकर (हातमागावरचे) पुढे गिरणी कामगार झाले. कारकून, रेल्वेचे पंचिंग मशिन, बँकेचे कामकाज हातांनी लेजर भरण्याऐवजी काही सेकंदात संगणकीकृत स्टेटमेंट-पासबुके-तिकीटे, पैसे मिळू लागले. मशिनद्वारे (ATM) द्वारा नोटांचा भरणा होऊ लागला आणि बटणे दाबताच मशिनमधून नोटा हातात पडू लागल्या. सर्व यंत्राचाच प्रभाव म्हणजे वरदानच आहे, हे कालांतराने लोकांना पटू लागले,

आणि आता अंगवळणी पडले. हा सर्व काळाचा महिमा आहे यात तिळमात्र शंका नाही.

काम करता करता, काळ मागे पडला आणि कामाचा वेग एवढा प्रचंड वाढला त्या वेगामागे धावता धावता भलतीच कामं मनुष्याच्या हातून घडत गेली आणि त्याने स्वतःच आपला विनाश ओढवून घेतला. आणि त्याला स्थितीचा किंकर व्हावे लागले. आणि जादूच्या दिव्याचा राक्षस 'भस्मासूर' होऊन माणसाच्याच डोक्यावर हात ठेवू लागला. आता ह्याला आवर घालणे कठिण होऊन बसले आहे. दुर्दैवाने माणसाची लय बिघडून तो वलयांकित होण्याऐवजी तो प्रलयांकित होत आहे. अमेरिकेला 'आव्हान ' देता देता माणसाने वैज्ञानिक प्रगतीवर आणि त्याचबरोबर कामाच्या वेगावर संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. हा 'अणुयुगातील' वेगाचा बळी ठरला.

ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करताना नॉस्टरडॅमस चे भाकित खर होतंय की काय ? अशी मनात पाल चुकचुकायला लागली आहे. अत्यंत प्रगत राष्ट्र-वैभवशाली राष्ट्र-शस्त्र-अस्त्राने श्रीमंत-युनोवर प्रभुत्व गाजवणारे, प्रसंगी व्हेटो वापरणारे, अविकसित राष्ट्रांना पावाचा तुकडा टाकणारे राष्ट्र ! पण ते सुध्दा वेगाच्या भरात, पेचात सापडले असून या प्रसंगातून काय मार्ग काढावा ? अशा विवंचनेत पडले आहे. हा सगळा काळाचा महिमा आहे. 'आदमी को वक्त से डरकर रहना चाहिये' ह्या अर्थाचे ' वक्त ' सिनेमातले शीर्षक गीत या सद्यस्थितीवर अगदी समयोचित आहे.

असा हा काळाचा वेग, कामाचा वेग, आणि प्रगतीचा आवेग आता आवरता येणे मुश्किल आहे. काळाच्या ओघात कोण कुठे फेकला जाईल याचा भरवसा उरलेला नाही.

भगवान् श्रीकृष्णाने भगवत् गीतेत जरी सांगितले असले की -

> कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
> मा कर्म फलहेतु र्भूर्मा ते सङ्गोऽस्त्व कर्मणि ॥

मनुष्याने कर्म करत रहावे फलाची अपेक्षा धरू नये, पण संगणक युगात याचा विरोधाभास आहे. कर्म केले म्हणजे कमांड केली की तुमची डिमांड पूर्ण होते. आधुनिक वेगवान युगात, संगणक क्षेत्रात मनुष्य एका बटणाने जगातील कुठल्याही देशाला बेचिराख करू शकतो. हा वेग मानवाला कुठे नेऊन पोचवणार आहे हे कुणीच जाणू शकत नाही. परंतु एवढे 'सांत्वन करून, तुमचे अश्रु पुसू शकणार नाही. त्याकरता मानवतेचा प्रेमाचा हातच पुढे यावा लागेल.

एकविसाव्या शतकातली ही काळ-काम वेगाची गणिते संगणकाला सुध्दा संभ्रमित करतील अशी आहेत.

**सुरेश देशपांडे**
१/२ जान्हवी अपार्टमेन्ट
चरई, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनि : ५४३ ०९९८

• • •

**दिशा नियमित वाचा.**
**दिशाचे वर्गणीदार व्हा.**

# आजचे ग्रामीण साहित्य : ग्रामीण किती-नगर किती ?

ठाण्यातील समर्थ सेवक मंडळाच्या कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील पदवी गटातील उत्तेजनार्थ पारितोषिक मिळालेले हे भाषण. वेगळ्या विषयावर विचार प्रवृत्त करायला लावेल असा हा लेख आहे. - संपादक

या आधुनिक समाजात आयुष्य आणि व्यवहार यांची सांगड घालत असताना, अतिशय गुंतागुंतीचा, संघर्षमय जीवन प्रवाह निर्माण झाले आहेत. समाजात असलेले अनेक धर्म, जात, पंथ, संप्रदाय भाषा अशा छोट्या-मोठ्या गोष्टींमुळे दोन गटात या सर्वांचे विभाजन झालेले आढळते. साऱ्या गोष्टींचा परिणाम समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यावर होऊन अप्रत्यक्षपणे हा समाज दोन गटांमध्ये विभागला गेला. विभागलेल्या व्यवस्थेत संघर्ष हे अपरिहार्य होतात. संघर्ष हे अंतर्गत आणि बाह्य पातळीवरून होऊन त्याचा आविष्कार प्रतिक्रियेच्या रूपाने बाहेर पडतो. तो सामूहिक स्तरात असेल वा व्यक्तिगत. भारतीय राज्यघटनेत दिलेल्या सात मूलभूत हक्कांतील कोणत्या ही स्वातंत्र्यातून त्या बद्दलची भावना प्रगटेल. मुख्यतः त्या विचाराला न कळत दिशा देण्याचं काम साहित्य करतं. ते मग कोणत्याही भाषेत असो वा कोणत्याही व्यक्तीने शब्दबध्द केलेले असो. त्यावेळी ते लिखाण त्या विचारांना आणि साहित्याला समृध्द करत असते. इथेच साहित्य समृध्दीची बीजं रोवल्या जातात.

समाजव्यवस्थेत झालेल्या बदलामुळे हळूहळू समाज घटकात स्थितीशीलता निर्माण होते. त्याचा परिणाम साहित्यावर होतो आणि साहित्यात नव नवे चैतन्यदायी प्रवाह निर्माण होण्यास सहाय्यभूत होतो. खऱ्या अर्थानं साहित्य हा समाजाचा आरसा असतो. त्याचचं प्रतिबिंब आपल्याला साहित्यात दिसून येत.

भारतीय स्वातंत्र्यानंतर प्रगतीच्या असमान वेगामुळे असमतोल विकास झाल्याच दिसून येत. एकीकडे आधुनिकीकरणामुळे विशिष्ट समुदायाने ते बदल स्वीकारले आणि राहणीमान, व्यवसाय अर्थव्यवस्था हे सारे काही बदलले आणि हा समूह 'शहरी समुदाय' म्हणून ओळखला जाऊ लागला.

ज्या लोकांपर्यंत आधुनिक प्रगतीची माध्यमे पोहचली नाहीत अथवा हळू हळू पोहचत आहे. तो समाज त्याच्या पिढीजात व्यवसाय, संस्कृती, परंपरेतून बाहेर येऊ शकला नाही आणि हा समूह 'ग्रामीण समाज' म्हणून ओळखला जाऊ लागला.

शहरी समाज आणि ग्रामीण समाज अशी मांडणी प्रथमतः समाज व्यवस्थेत झाली आणि त्याचे प्रतिबिंब साहित्यातून दिसून येऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात अशा प्रकारचे लिखाण खूप होत गेले आणि साहित्यात हे दोन नवे विचार प्रवाह निर्माण झाले.

ग्रामीण आणि शहरी समाजात अस्तित्वात असलेल्या व्यक्तीच्या जगण्याची ध्येय, प्रेरणा, जीवनकल्पना भिन्न-भिन्न आहेत, त्याचबरोबर जगण्याची माध्यमं, साधन आणि वातावरण ही वेगवेगळे आहे. ह्या भिन्न प्रेरणांचा परिणाम साहित्यात दिसून येतो.

शहरी व ग्रामीण समाज हे एकमेकांना कोणत्याच पातळीवर नीट समजून घेत नाहीत. त्याच परिणामांमुळे

दोघे ही आपलं स्वतःच स्वतंत्र अस्तित्व जपतात. ते संकुचित कक्षेतच स्वतःच्या विकासाची स्वप्ने पाहतात आणि त्यामुळे स्वतःचं अस्तित्वच मर्यादित करून टाकतात.

**ग्रामीण साहित्य उगम आणि वाटचाल** - भारतातील ७०% समाज हा आज ही खेड्यात राहतो. त्या खेड्यात राहणाऱ्या समुदायाच्या उपजीविकेचे साधन शेती आणि शेतीवर आधारित उद्योग असं आहे. ग्रामीण भागात निर्माण झालेली १२ बलुतेदार पध्दत त्यामुळेच अस्तित्वात आली आहे. त्यात चांभार, न्हावी, सुतार, लोहार अशा प्रकारचे विशिष्ट समाज त्यांच्या व्यवसायामुळे निर्माण झाले. त्यांची ही काळाच्या ओघात स्वतःची संस्कृती-परंपरा निर्माण झाली, पण त्यांची इतर सर्व ग्रामीण समाजाशी कधीच नाळ तुटली नाही. ती कायमची सोबतच राहिली.

ग्रामीण समाजाच्या साहित्याची निर्मिती ही बोलीभाषेतून झाली आणि संवर्धन ही बोली भाषेनेच केले. लिखाणाच्या साधनांची विपुलता नसल्यामुळे हा प्रश्न प्रामुख्याने उद्‌भवतो. ग्रामीण भागात ही वेगवेगळ्या बोली भाषा निर्माण झाल्या. उत्तर महाराष्ट्र,धुळे. जळगावकडे-अहिराणी, विदर्भात-वऱ्हाडी, कोकणात-कोकणी अशा विविध भाषा दिसून येतात.

खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याचा उगम आणि विकास संत परंपरेत झालेला आढळून येते. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास या साऱ्या संतांनी जे साहित्य लिहलं ते ग्रामीण संस्कृती आणि ग्रामीण लोकांच्या खूप जवळचं आहे. इथेच ग्रामीण साहित्याच्या उगमाची बीजं लावली गेली.

दिशा देण्याच काम साहित्य करतं ते मग कोणत्या ही भाषेत असो वा कोणत्या ही व्यक्तीने शब्दबध्द केलेले असो. त्यावेळी ते लिखाण त्या विचारांना आणि साहित्याला समृध्द करत असते. इथेच साहित्य समृध्दीची बीजं रोवल्या जातात.

मधल्या काळात मुकुंदराज, मोरोपंत, वामन पंडित यासारखे अनेक कवी आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवून साहित्य समृध्द करण्यात मोठी भर घातली. पण त्यांचे साहित्य ग्रामीणच होते असे म्हणणार नाही.

१८ व्या शतकात महात्मा फुलेंनी सर्वप्रथम ग्रामीण भागाचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू असलेल्या शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडली. शेतकऱ्यांचा आसूड या माध्यमातून ग्रामीण साहित्याला वास्तवाची जोड देण्याचा प्रयत्न होता.

बहिणाबाई चौधरींनी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात केलेलं लिखाण हे ग्रामीण साहित्यात मोलाचे ठरले. नंतरच्या काळात श्री. म. माटे आणि वी. रघुनाथ यांचं साहित्य ग्रामीण साहित्याचा प्रवाह निर्माण करणारं ठरलं.

१९ व्या शतकात साहित्यामध्ये बालकवी, केशवसूत, बा. सी. मर्ढेकर, बा. भ. बोरकर अशा साहित्यकारांनी नवा विचार प्रवाह मांडला. यात ग्रामीण जीवनाचं चित्रण कमी आहे, पण निसर्गाशी जवळिक साधण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्यापूर्वी पेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण साहित्यात खूप लिखाण झालं आहे. गो. नी. दांडेकर, द. ता. भोसले, शंकर पाटील अशा साहित्यकारांनी विपुल लिखाण केलं. आनंद यादव यांनी 'गोतावळा-झोंबी' मधून ग्रामीण जीवनाचे रुप दाखविण्याचा प्रयत्न केला. व्यंकटेश माडगूळकर यांनी बनगरवाडी मधून ग्रामीण व्यवस्थेचं वर्णन केलं. रा. र. बोराडे यांनी ग्रामव्यवस्था व जीवन याचं साहित्यातून यर्थाथ वर्णन केलं आहे. प्राचार्य बोराडे सरांनी पाचोळा, मळणी, पेरणी मधून ग्रामीण साहित्याला एका उंचीवर नेलं आहे. त्यांनी त्यांच्या आमदार सौभाग्यवती या नाटकातून ग्रामीण राजकारणाचाही वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

' धग ' लिहणारे उध्दव शेळके यांनी ग्रामीण जीवनाची भीषण वास्तवता समोर आणली. तणकट मधून राजन गवस यांनी वेदनेला तोंड फोडले. रुस्तुम अचलखांब, सुरेश पाटील यांनी आपल्या कथांमधून ग्रामीण जीवनाचे विविध कांगोरे समोर आणले आहेत.

भास्कर चंदनशीव, नागनाथ कोतापल्ले, यांच्या लिखाणातून ग्रामीण साहित्याला अजून उंचीवर नेण्याच काम केलं. पण नव्या पिढीत खूप कमी लिहणारे साहित्यिक दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण साहित्यात दर्वेदार साहित्य कमी निर्माण होऊ लागल.

ग्रामीण काव्य प्रकारात खूप कवींनी आपलं योगदान दिलं आहे. ना. धों. महानोर यांनी खूप मोठे योगनदान आपल्या काव्यसंपदेतून दिलं आहे.

आम्ही कावाडाचे धनी...लिहणारे इंद्रजीत भालेराव हे ग्रामीण साहित्यातील मैलाचा दगड ठरले. ग्रामीण भागातून शहराकडे वळणाऱ्या विद्यार्थी वर्गाला आवाहन करताना इंद्रजीत भालेराव सर म्हणतात.

काट्या कुट्याचा तुडवत रस्ता
माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता...

पिंपळखुट्यांच्या नारायण सुमंतानी ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर विदारक चित्रण केलं आहे. रास आणि गोंदर मधून जगदीश कदम यांनी ग्रामीण जीवनाची व्यथा मांडली आहे.

आम्ही मेंदर मेंदर
ज्यानं त्यानं हकलावं,
पाच वर्षाच्या बोलीवर
होतो आमचा लिलाव...

असं म्हणत विठ्ठल वाघांनी ग्रामीण व्यवस्थेच्या राजकीय कुवतीचं दर्शन घडविले. कोरड्या नक्षत्रांमधून... प्रकाश होळकर यांनी पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांची व्यथा मांडली आहे.

खऱ्या अर्थानं प्रचलित साधनांनी हे समोर आलेलं साहित्य आहे. अजून ही ग्रामीण भागात प्रचलित आणि प्रसिद्ध न झालेलं साहित्य खूप आहे. ते ग्रामीण भागातील अस्सल रुजलेले प्रकार आहेत. त्यात १) पोवाडा, २) कीर्तन ३) लावणी असलेलं साहित्य दुर्लक्षल्या गेलं आहे. ही बाब ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने खंत करण्यासारखी आहे.

वऱ्हाड निघालं लंडनला... असं एकपात्री प्रयोग करणारे आणि ५२ पात्र रंगवणारे लक्ष्मण देशपांडे हे ग्रामीण बोलीचा सुंदर उपयोग करतात. निळू फुले, दादा कोंडके यांच्या भाषेत ही आपल्या ग्रामीण भागाच्या बोलीभाषेचा अनुभव येतो. ग्रामीण साहित्य अशाप्रकारे समृध्द होत गेलं.

विज्ञान - तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शहरी भाग विकसित होत गेला. त्यामुळे खेड्यातून येणारा लोंढा मोठ्या प्रमाणावर शहरात स्थायिक होऊ लागला. शहरांच रूपांतर मोठ्या महानगरात होऊ लागलं. बेसुमार लोकवस्ती वाढू लागली. जीवनात गतिमानता आली. जीवनाच्या काही संकल्पना-अनुभवात बदल होऊ लागले. हळूहळू महानगरी जीवनपध्दती अस्तित्वात आली.

**नागरी साहित्य उगम :**

नगर, महानगरामध्ये जे जीवन अनुभवलं, ते हळू हळू प्रगट होऊ लागल. त्या महानगरी जीवनाच्या प्रेरणा, ध्येय, व्यवहार हे वेगवेगळे आहेत. त्या साऱ्यांच प्रतिबिंब नागरी साहित्यात दिसून येत. शहरी जीवनात असलेली गतिमानता भीषण वास्तव, मुखवट्यामागचे चेहरे, बदलणाऱ्या संकल्पना यामुळे शहरी (नागरी) साहित्य वास्तविकतेशी जवळीक साधणारं वाटू लागलं.

नागरी जीवनावर मल्लिका अमरशेख यांचं " मला उध्वस्त व्हायचंय..." हे पुस्तक अनुभवाचं प्रगटीकरण

करतं. अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे हे कवी आपल्या कवितांमधून नागरी जीवनाच्या वेदना-संवेदना प्रगट करतात. प्रवीण दवणे सर आपल्या लिखाणातून नागरी जीवनाच्या मूल्यांची सांगड छान पध्दतीने घालतात. गणेश पाडगावकर माणसाच्या मनाची घालमेल आणि नागरी जीवनावर प्रकाश टाकण्याच काम गीत/गझल आणि काव्यातून करतात.

नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ आपल्या साहित्यातून नागरी जीवनानं बदलेल्या संकल्पना आणि त्या समाजाचा प्रवास यावर प्रकाश टाकतात. द्वारकानाथ सांझगिरी शिरीष कणेकर यांनी उपहासात्मक शैलीत नागरी जीवनाचा वेध घेतला आहे. मुंबईतील आणि महानगरी जीवनाची वेध घेणारी अनेक नाटकं निर्माण झाली. त्यात मुंबईत शिवसेनेनं बंद पुकारला तर काय परिस्थितीती उद्‌भवते याचा वेध घेणारं - किरण पत्रीकरांच प्रासंगिक करार हे नाटक नागरी जीवनाची जीवनपध्दती दृष्टीकोन यावर दृष्टिक्षेप टाकत.

नागरी साहित्य प्रामुख्याने अनुभवातून प्रगट झाले आहे. कोणत्याही कल्पना विश्वात मुक्त विहार न करता. जे आहे ते तसं प्रगटलं आणि त्यातून एकमेकांशी जवळिकता निर्माण करणारं नागरी साहित्य निर्माण झालं.

नागरी साहित्य हे जसं पुस्तकातून आपल्याला मिळतं तसंच ते वर्तमानपत्र साप्ताहिक मासिकातून जास्त वाचायला मिळतं. त्यातून ही नागरी साहित्याला प्रगटीकरणाचं माध्यम न घेतलेला समाज नागरीकरणामुळे निर्माण झाला. दोघांच्याही जीवनपध्दती, अनुभव, यामध्ये प्रचंड तफावत आहे. या तफावती मध्येच संघर्षाची बीजं आहेत.

**ग्रामीण साहित्य :**

नागरी साहित्य संघर्ष हा वेगवेगळ्या पातळ्यावर सुरू झाला आहे. त्यात प्रामुख्याने शिक्षणासाठी खेड्यातून शिकायला आलेला शेतकऱ्याचा मुलगा ज्यावेळेस शिक्षण घेऊन बाहेर पडतो. त्यावेळेस खऱ्या अर्थानं संघर्षाला सुरुवात होते. तो शिक्षण जिथं घेतो तो नागरी समाज आणि ज्या व्यवस्थेतून आलेला असतो तो ग्रामीण समाज ह्या दोन्ही वेगवेगळ्या प्रवाहाचा तो एक घटक आहे. त्याच्या द्वारे जे प्रगट होत गेलं ते संमिश्र होतं आण त्याचा परिणाम हे साहित्य कोणत्या प्रकारातलं हा संभ्रम निर्माण झाला.

.....आणि दुसरीकडे ग्रामसंस्कृती विज्ञानामुळे लुप्त होऊ लागली. जुन्या साधनांची जागा आधुनिक साधनांनी घेतली. नागर, कुळवाची मोटाची जागा सबमर्सिबल पंप आणि आधुनिक पाणी उपसा करणाऱ्या पंपानी ग्राम संस्कृतीच ही नागरीकरण होऊ लागलं.

ग्रामीण व नागरी साहित्यामध्ये फरक करत असताना मराठी साहित्य समाज आणि संस्कृती या पुस्तकात मानदंडाचा मानसिक जुलूम केल्याचा आढळून येत.

अ) कोणत्याही व्यवस्थेत बाहेरच्या व्यवस्थेतील लोकांनी शिरू नये म्हणून संघर्ष होतात. तेच ग्रामीण साहित्य आणि नागरी साहित्यात झाले एकमेकांनी मिसळण्यात अमान्य केले व संघर्ष झाला.

ब) ग्रामीण माणसाची भूमिका नीटपणे समजून घेतली गेली नाही. नागरी साहित्याने आपआपल्या व्यवस्थेवर लादली जाण्याची सक्तीची भूमिका घेण्यात आली.

क) ग्रामीण भाग हा समाजाचा भाग आहे हे साऱ्या व्यवस्थेने नाकारले.

इ) ग्रामीण व्यवस्थेला प्रामुख्याने नागरी - शहरी व्यवस्थेचं आकर्षण आहे. अंधानुकरण करण्याची सवय ग्रामीण लोकांना झाली.

ई) अजून ही ग्रामीण साहित्याचा वाचक वर्ग हा शहरी आहे.

ई) ग्रामीण व्यवस्थेच्या सर्व आर्थिक, सामाजिक संस्था या शहरात आहेत. त्याचा ही प्रतिकूल परिणा ग्रामीण साहित्यावर झाला.

या प्रश्नाचं उत्तर बदलत जाणाऱ्या सर्व व्यवस्थेमुळे अशक्य आहे. प्रथमत: या संदर्भात आपण कोणते निकष ठरवतो या वर ते अवलंबून आहे. ते निकष कसे ठरवायचा हा ही प्रश्नच आहे. पण यावर सर्वोत्तम उपाय म्हणजे साहित्यावरून आपण ते कोणत्या प्रकारात मोडतो हे ठरवू शकतो. साहित्य हे जर ग्राम जीवनाशी, व्यवस्थेशी पध्दतीशी निगडीत असेल तर ते साहित्य ग्रामीण. साहित्य हे जर नागरी जीवनाशी असेल तर ते साहित्य नागरी साहित्य. पण लिखाण करणारा लेखक हा ग्रामीण आहे वा नागरी हे निकष नसावेत. त्यामुळे साहित्यावर प्रश्नचिन्ह उभा राहण्याचा प्रश्न येत नाही.

साहित्य हे संस्कृती समृध्द करण्याच अमोघ शस्त्र आहे. त्यामुळे त्याला कोणत्याही कक्षेत परंपरेत अडकवून संकुचित करू नये हेच महत्त्वाचे आहे. मानवी जीवन जसं बदलत जातं तसं साहित्याच्या दिशा ही बदलत जातात. त्यनुसार आपण ते बदल स्वीकारणं अपरिहार्य असतं. आपण साहित्यातला एखादा विशिष्ट प्रकार समृध्द करण्यात मग्न होण्यापेक्षा साहित्य समृध्द करण्यासाठी प्रयत्न करण ही आजच्या काळाची गरज आहे.

---

**अभिजित भा. ब्रम्हनाथकर**
३५, योगेश्वर, शिवाजीनगर, परभणी - ४३१४०१
(०२१५२) २९६२३

• • •

|| श्री राम प्रसन्न ||

१०१, श्री कृष्ण अपार्टमेंट
लुईसवाडी,
ठाणे - ४०० ६०४.
ता. २४-११-२००१

प्रा मोहन पाठक यास

सप्रेम नमस्कार,

दिशा आक्टोबर २००१ चा अंक मिळाला. त्यामध्ये माझे व डॉ. गणपुले यांच्या संवादाचे जे टिपण मी तुमच्याकडे बरेच महिन्यांपूर्वी पाठवले होते ते छापून आल्याचे वाचून खूप आनंद झाला.

संपादन चांगले केले आहे. परंतु याचे शीर्षक मात्र पुरेसे बोलके नाही. ते ग्रंथालयांतील कार्य संस्कृती संबंधी उद्बोधक संवाद असे अगर एका जेष्ठ ग्रंथपालाचे मनोज्ञ दर्शन.. असे हवे होते. शीर्षकामध्ये वाचक खेचण्याचे सामर्थ्य हवे. सुचविल्याबद्दल राग मानू नये.

आपण २४ तासांचा पुरेपुर उपयोग करतो. मोठ्या जबाबदारीच्या कामात व्यग्र असतो. कौतुकाचे आहे. सर्व परिवारास नमस्कार.

ह. श्री. परांजपे
निवृत्त ग्रंथपाल
कला वाणिज्य महाविद्यालय, ठाणे.

# यशवंतराव चव्हाणांचे खरे स्मारक : य.च.म. मुक्त विद्यापीठ नाशिक

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा गेल्या जवळ जवळ एक तपातील कार्याचा आवेग व पुरोगामी दृष्टीने विकास करण्याचे धोरण याबद्दल माहिती देणारा लेख - संपादक

महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाचे आणि सांस्कृतिक प्रगल्भतेचे मंगलमय स्वप्न पहाणाऱ्या आदरणीय यशवंतराव चव्हाण या लोकनेत्याच्या नावाने या विद्यापीठाची स्थापना झाली आहे. लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा देऊन जनसामान्यांच्या घरापर्यंत ज्ञानाची गंगा पोहचविण्यासाठी उच्च शिक्षणाचे लोकाभिमुख नियोजन करणारे माननीय यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान हे विद्यापीठाच्या वाटचालीचे मध्यवर्ती सूत्र राहिले आहे. आज जागतिकीकरणाचे वारे वाहत असताना आणि स्पर्धेच्या वातावरणात मराठी माणसाला ज्ञानात्मक कौशल्यांच्या आधारावर आंतरराष्ट्रीय पातळीवर सक्षमपणे उभे राहता यावे यासाठी विद्यापीठ विविध उपक्रम राबवीत आहे.

विद्यापीठाची संपूर्ण महाराष्ट्रात १४५१ अभ्यास केंद्रे असून गेल्या वर्षभरात १,१३,७६५ विद्यार्थ्यांनी ६३ शिक्षणक्रमांमध्ये प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांसाठी आतापर्यंत २३६ अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांकरिता तयार करण्यात आलेल्या अध्ययन सामुग्रीमध्ये ८२४ पाठ्यपुस्तके, २०७ ध्वनिफिती, २०२ चित्रफिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. याखेरीज दर महिन्याला आकाशवाणी मुंबई केंद्राद्वारे आणि आठवड्यातून दोन वेळा सह्याद्री या दूरदर्शन वाहिनीवरून विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्यात येत आहेत. इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा अध्ययन प्रणालीत प्रायोगिक तत्त्वावर वापर सुरु करण्यात आला आहे. 'डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक इंजिनीअरिंग' आणि एम.बी.ए. शिक्षण क्रमासाठी 'व्हर्च्युअल क्लासरूम' अर्थात 'पडद्यावरील शाळा' या नव्या शिक्षण प्रसारतंत्राचा वापर करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशापासून परिक्षेच्या निकालापर्यंत सर्व टप्प्यावर या संगणकाधिष्ठीत प्रणालीचा वापर यशस्वी ठरला आहे. त्यामुळे गडचिरोलीपासून मुंबईपर्यंत विविध भागांत विखुरलेल्या विद्यार्थ्यांना सारख्याच गुणवत्तेचे मार्गदर्शन उपलब्ध होत आहे. या प्रणालीचा क्रमाने विस्तार केला जात असून पुढील वर्षापासून कृषि, शिक्षणशास्त्र, वृत्तपत्रविद्या आणि ग्रंथालय माहिती शास्त्राच्या शिक्षणक्रमांमध्ये 'पडद्यावरील शाळेचा' वापर वाढविण्याचा विद्यापीठाचा संकल्प आहे. विद्यापीठाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत म्हणजेच डिसेंबर २०००पर्यंत एकूण ५,००,४७१ विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या शिक्षणक्रमांसाठी नावनोंदणी केली असून त्यांच्या वेळोवेळी ४०८ परीक्षा घेण्यात आल्या आहेत. त्यात ३,३३,५८६ विद्यार्थी परीक्षांना बसले असून त्यापैकी १,८५,७४८ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पदवी, पदविका आणि प्रमाणपत्रे संपादित केली आहेत. गेल्या वर्षी डिसेंबर २००० पर्यंत एकूण ४८ परीक्षा घेण्यात आल्यात. त्यात ९७,११६ विद्यार्थी परीक्षेला बसले, त्यापैकी ५८,०५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

दूरशिक्षण परिषदेच्या गेल्या दोन वर्षांच्या अहवालानुसार विद्यार्थीसंख्या, अभ्यासकेंद्र, अभ्याक्रम संख्या व किमान कर्मचारी वर्गात व्यवस्थापन-या विद्यापीठाच्या तुलनेत आपले विद्यापीठ अग्रेसर ठरले आहे. संख्यात्मक व गुणात्मक पातळीवरील विद्यापीठाच्या ह्या वाटचालीत महाराष्ट्रातील अनेक शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणसंस्था आणि विद्यार्थी यांच्या सकारात्मक

पाठिंब्याचा वाटा आहे. ह्याची विद्यापीठाला जाणीव आहे.

या आकडेवारीबरोबरच गेल्या वर्ष भरातील काही ठळक शैक्षणिक घडामोडींची नोंद घेणे रोचक ठरेल. यावर्षी आपण 'वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रम' 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदव्युत्तर शिक्षणक्रम' 'इंडस्ट्रियल पेंटिंग प्रमाणपत्र शिक्षणक्रम' 'कॉम्प्युटर हार्डवेअर मेंटेनन्स' 'कॉम्प्युटर ऑपरेटिंग स्किल्स' तसेच शालेय व तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांकरिता संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने सुरु झाले आहेत. बी.ए./बी.कॉम पदवी शिक्षणक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे. एम.लिब. शिक्षणक्रमात वर्तमान घडामोडी व माहिती तंत्रज्ञानातील बदलत्या प्रवाहाचे आकलन होण्यासाठी 'ज्ञानगंगोत्री' या त्रैमासिकाचे प्रकाशन सुरु करण्यात आले आहे. शिक्षण प्रशिक्षण हा या विद्यापीठाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. आत्तापर्यंत ८०,००० हून अधिक माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून गेल्या वर्षी ६,००० शिक्षकांपैकी २,८०४ शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.

या शैक्षणिक उपक्रमांबरोबरच मुख्यालयातील ४५,००० चौ. फुटांच्या, ३ कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या विद्याशाखा-इमारतीचे बांधकामही पूर्ण झाले असून या नव्या इमारतीचे उद्घाटन नुकतेच मा. राज्यपालांच्या हस्ते झाले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने विद्यापीठाच्या प्रांगणात मा. यशवंतरावजींचा ११ फूट उंचीचा व ८०० किलो वजनाचा ब्राँझचा पूर्णाकृती पुतळा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी संरक्षणमंत्री मा. शरदरावजी पवार यांच्या शुभहस्ते व राज्याचे शिक्षणमंत्री ना. दिलीप वळसे-पाटील यांच्या उपस्थितीत कृषीविज्ञान भवनाचेही उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या लोकाभिमुख शैक्षणिक नियोजनाचा भाग म्हणून बुलढाणा येथे राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिनी व त्यांच्या जन्मगावी 'ग्रामशिक्षण केंद्राची' स्थापना करण्यात आली. जे काम स्वतंत्र ग्रामीण विद्यापीठामार्फत करता येण्याजोगे आहे ते काम मुक्त विद्यापीठ करु शकेल असा विश्वास महाराष्ट्र शासनाने आपल्यावर व्यक्त केला. याचा विद्यापीठाला विशेष आनंद वाटतो.

विद्यापीठाच्या प्रांगणात टपाल कचेरी पाठोपाठ आता दूरध्वनी वितरण शाखेचे केंद्रही स्थापन झाले आहे. त्यामुळे राज्यातील फायबर ऑप्टिक केबलच्या जाळ्याचा लाभ आता आपोआपच विद्यापीठात होत असून ISDN च्या माध्यमातून आपले शैक्षणिक जाळे प्रस्थापित होऊ शकेल. ऑनलाईन प्रवेशापासून परीक्षेपर्यंत विद्यापीठ या सुविधेचा उपयोग करुन घेणार आहे. मुक्त व दूरशिक्षण पद्धतीद्वारे शिक्षण देणाऱ्या, देशातील विविध विद्यापीठे आणि संस्था यांचा गुणात्मक दर्जा ठरविण्यासाठी स्वतंत्र निकष व मूल्यमापन पद्धतीचा आकृतिबंध आवश्यक होता. त्याकरिता दूरशिक्षण परिषदेने राष्ट्रीय स्तरावर एक कार्यगट स्थापन केला. या क्षेत्रात विद्यापीठाने केलेल्या प्रयोग व अनुभवाचा लाभ घेण्याच्या हेतूने दूरशिक्षण परिषदेने या गुणवत्ता निर्धारण समितीचे नेतृत्व मुक्त विद्यापीठाकडे सोपविले. या संदर्भात विद्यापीठात अलीकडे 'गुणवत्ता निर्धारण आणि दूरशिक्षणात माध्यमांचा वापर' या विषयावर दोन राष्ट्रीय कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात देशभरातील मुक्त विद्यापीठे आणि दूरशिक्षण संस्थांचा व्यापक सहभाग लाभला. ISO 9001 याचा मुक्त व दूरशिक्षण पद्धतीत वापर करण्याविषयी या कार्यशाळेत प्रामुख्याने विचार करण्यात आला.

दरवर्षी विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्तारसेवेचा भाग म्हणून 'लोकसंवाद सत्र' आयोजित केले जाते. या वर्षी या लोकसंवाद सत्रात प्रा. राम कापसे, डॉ. भालचंद्र नेमाडे, प्राचार्य पी. बी. पाटील, डॉ. अरुण टिकेकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. चालू वर्षापासून नव्याने दशकातील कर्तृत्वान महिलेस 'रुक्मिणी पुरस्कार'

देण्यास प्रारंभ झाला आहे. पहिला पुरस्कार सांगलीच्या श्रीमती निर्मला कुलकर्णी यांचा त्यांच्या अपंगसेवेच्या संदर्भात केलेल्या सामाजिक कामगिरीसाठी देण्यात आला.

विद्यापीठातर्फे अंगणवाडी सेविकांसाठी 'बालसेविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम निरंतर शिक्षणातील ब्युटी थेरपी अँड पार्लर', 'डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी अँड ग्राफीक आर्ट' 'इंडस्ट्रिअल सिक्युरिटी' हे प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने सुरु करण्यात आले आहेत. त्याचबरोबर या विद्यापीठाने लोकशिक्षणाची आणि ग्रामीण समाजाच्या पुनर्बांधणीतील शैक्षणिक जबाबदारी उचलण्याच्या हेतूने काही नवे उपयुक्त अभ्यासक्रम विकसित करण्याचे ठरविले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत नवी दिशा देणाऱ्या 'स्वयं सहाय्यता गट' योजनेत स्त्रियांना सक्षम करण्यासाठी 'स्वयं-सहाय्यप्रेरक गट प्रमाणपत्र' शिक्षणक्रम विकसित करण्यात आला असून राज्यातील अंगणवाडी सेविकांना हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन देण्याच्या उपक्रमात शैक्षणिक सहभाग देण्याची योजना या अभ्यासक्रमात अभिप्रेत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेबरोबरच राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या शासकीय धोरणाला अनुलक्षून 'पंचायतराज व ग्रामीण विकास' या विषयातील प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम विद्यापीठ विकसित करीत आहोत. गुणवत्तापूर्ण लोकप्रशासन, स्थानिक नैसर्गिक व मानवी संपत्तीचे कौशल्यपूर्ण नियोजन या साठी प्रशिक्षित लोकनेतृत्व निर्माण करण्यासाठी या अभ्यासक्रमांचा निश्चित उपयोग होईल असा विद्यापीठाला विश्वास आहे.

माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवनवीन संकल्पना स्वीकारून त्यांचा शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी जास्तीत जास्त वापर करायचे विद्यापीठाने ठरविले आहे. 'पडद्यावरची शाळा' या उपक्रमातून शेतकरी, ग्रंथपाल, पत्रकार, अभियंते अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या समाज घटकांना शैक्षणिक सेवांचे व्यापक जाळे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. यापूर्वी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना संगणक उपयोजनाचे प्रशिक्षण देण्यात ही विद्यापीठाचा मोठा सहभाग राहिला आहे. आता महाराष्ट्र शासनाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणक माहिती-तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी 'नवे महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेतून माहिती - तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या संस्था आणि कंपन्याकडून खुल्या स्पर्धेच्या तत्त्वावर निविदा मागविण्यात आल्या होत्या. व्यापारी तत्त्वावरील संपूर्ण गुणवत्तेच्या आधारावरील या मुक्त स्पर्धात्मक निवडप्रक्रियेतून विद्यापीठाची निवड झाली असून राज्यातील सुमारे दहा लाख महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या माहिती-तंत्रज्ञान विषयक शिक्षणाच्या जबाबदाऱ्या पैकी काही भाग आता विद्यापीठाने स्वीकारला आहे.

माहिती-तंत्रज्ञानाच्या नव्या अनुदेशन पद्धतींचा आपल्या विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांमध्ये विस्तार करण्यासाठी विद्यापीठाने आत्तापर्यंत साडेतीन कोटींची गुंतवणूक केली आहे. दूरशिक्षण परिषद आणि महाराष्ट्र शासन यांच्या आर्थिक सहकार्यामुळे मुख्यालयातील दृक्‌श्राव्य निर्मिती यंत्रसामुग्रीच्या आणि राज्यभर पसरलेल्या विविध अभ्यासकेंद्रातील माहिती तंत्रज्ञानाच्या साधनसामग्रीच्या विकासाचा प्रकल्प पुढे नेऊ शकले आहे. विद्यापीठाने अभ्यासकेंद्रे आणि मुख्यालयातील बहुमाध्यमाधिष्ठित साधनसामग्रीचा विकास करण्याचे योजले आहे.

दोनशे वर्षांपासून ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट भारतात आली. तेंव्हाची परिस्थिती आणि महासत्तांच्या दबावगटाखालील जागतिकीकरणाचा सध्याचा रेटा यांच्यात बरेच साम्य आहे. ब्रिटीशांनी रेल्वे, तारायंत्रे, टपालसेवा, शिक्षण, इत्यादि सुधारणा आणल्या. पण इथली समाज संघटनेची एकजिनसी बांधणी विस्कळित केली. आपल्या देशातील नैसर्गिक आणि मानवी संपत्तीच्या

विकासाला वाव न ठेवता येथील जनतेत कायम दुही ठेवून स्थानिक संपदेची व्यापारी हेतूने लुबाडणूक करणे ही वसाहतवादी राजनीती होती. स्वातंत्र्योत्तर भारतात नववसाहतवादी आर्थिक दडपणामुळे अशीच काहीशी परिस्थिती निर्माण होत आहे की काय अशी चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गोंधळून न जाता आपली अस्मिता उंचावण्यासाठी लागणारी धडाडी भारताला दाखवावी लागणार आहे. एक प्रकारे हे नवे स्वातंत्र्ययुद्धच आहे. स्वयं-रोजगाराला चालना देणारी बहु कौशल्याधिष्ठित शिक्षणप्रणाली रुजविते. आणि निरंतर शिक्षणाच्या साहाय्याने अध्ययनशील समाजाची बांधणी करणे हे तुमच्या आमच्या पुढचे आजचे आव्हान आहे. गेल्या सात आठ वर्षांपासून आपल्या विद्यापपीठाच्या उपक्रमांमधून हे आव्हान पेलण्याची आम्ही पूर्णतयारी करीत आहोत. 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ह्या विद्यापीठाचे घोषवाक्य असून आता त्याचे कृतिकार्यक्रम वेगाने रुपांतर करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. हे आव्हान विद्यापीठ पेलू शकेल, तर आपल्या शेती आणि उद्योगधंद्यातील उत्पादनात संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पातळींवर वाढ होईल. आणि जागतिक स्पर्धेतील आपण गुणवत्तेच्या जोरावर आपले स्थान निर्माण करु शकू. ही गोष्ट केवळ भौतिक आणि तांत्रिक शिक्षणाने पूर्ण होणारी नाही. सर्व समाजघटकांनी जीवनाची समजूत व्यापक करण्याची आज गरज आहे. लोकशाही मूल्यांवर आधारलेली भ्रष्टाचार व पारदर्शी निर्णय प्रक्रिया असलेली विकेंद्रित राज्यपद्धती आणि प्रशासननीती आपल्या स्वभावात मुरवावी लागणार आहे. आपल्या देशात राजावर अवलंबून राहणारी समाजरचना नव्हती. पाण्याचे नियोजन, पिकांचे नियोजन, सार्वजनिक बांधकाम, रस्ते, विश्रामगृहे, उद्याने, शिक्षण आणि आरोग्यसेवा या सर्वच बाबतीत राजकीय निर्णयावर आपण अवलंबून नव्हतो. लोकसहभागातून सार्वजनिक कल्याणाची उभारणी करण्यावर भर देणारी परंपरा हा भारतीय समाज व्यवस्थेचा वारसा नव्या जागतिक आव्हानांना सामोरे जाताना पुनरुज्जीवित करण्याची गरज आहे. ह्या विद्यापीठाने हा स्थाननिष्ठ सांस्कृतिक वारसा आणि नवे शैक्षणिक तंत्रज्ञान यांचा सुयोग्य मेळ घालण्याचा वसा घेतला आहे. कृषीशिक्षणामध्ये आपण स्थानिक हवामान, पर्जन्यस्थिती, जमिनींचा मगदूर आणि बाजारपेठांची उपलब्धी लक्षात घेऊन आधुनिक शेती करण्याकरिता 'कृषिप्रयोग परिवाराची' स्थापना केली आहे. तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद व नाबार्डच्या सहकार्याने कृषि माहिती व सहस्त्र केंद्रे स्थापून दरवर्षी १२,००० शेतकऱ्यांना नव्या बदलांना सामोरे जाण्यासाठी कृषिसहस्त्र देण्याची योजना कार्यान्वित करीत आहोत. जागतिकीकरणामुळे आलेल्या मुक्त बाजारपेठांचे आव्हान भारतीय शेतकऱ्यांना पेलता यावे यासाठी चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ 'कृषिव्यवसाय व्यवस्थापन पदविका' हा नवा शिक्षणक्रमही प्रयोग परिवाराच्या माध्यमातून कार्यान्वित करीत आहे. पंचायत राज्य व्यवस्थेतील लोकनेत्यांना स्थानिक साधनस्रोतांच्या व मानवी संपत्तीच्या विकासाच्या नव्या दृष्टिकोनाची मर्मदृष्टी देता यावी आणि विकेंद्रित लोकशाहीचा पाया मजबूत करता यावा यासाठी आपण 'पंचायत राज' आणि 'ग्रामीण विकास' हा नवा शिक्षणक्रम सुरु होणार आहे.

अशा पद्धतीने ही मुक्तशिक्षणपद्धती महाराष्ट्राच्या मातीत रुजत आहे. त्याचा फायदा आपण सर्वांनी करुन घेणे आवश्यक आहे. खऱ्या अर्थाने हे यशवंतराव चव्हाणांचे स्मारक आहे.

**प्राचार्य अशोक प्रधान**

कुलगुरु,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

• • •

# अंधश्रध्दा

अंधश्रद्धेमुळे माणसाचे नुकसान होत असते. त्याबद्दल हा छोटा लेख. - संपादक

तीन वर्षापूर्वीची गोष्ट दुपारी सहज बाहेर डोकावले तर बाहेर कोलाहल ऐकू आला. कोणीतरी म्हटले गणपती दूध पितोय. नंतर लक्षात आले धातूची कुठलीही मूर्ती असली (गणपतीची) तरी तोच अनुभव. आता सगळ्यांकडे असेलच असे नाही पण कुतुहल जागे झाले. शेजारच्या बायका अहो तुमच्या देवात गणपतीची मूर्ती आहे का ? मग खरोखर सर्वांच्या हट्टासाठी तो ताम्हणात दुपारी ३ वाजता काढला. चमच्यात दूध घेऊन गणपतीच्या तोंडाशी टेकवल्यावर त्याचा दात त्यात बुडलेला होता पण दूध संपत होते. हे कसे शक्य आहे. तास दोन तासात सर्व शहरात या बातमीचे पीक आले. अखेर बातम्यात वैज्ञानिकांचे मत, गुरुत्वाकर्षण, हवेचा दाब, सर्व माहिती सांगण्यात आली. चांभाराने त्याचे चप्पल ठेवायचे ते लोखंडी सामान त्याला द्रव लावला तर तो द्रव ओढला जात होता. म्हणजेच यात सत्य किती ? अंधश्रध्दा किती ?

मांजर आडवी गेली, गेले सात पावले मागे. आता मांजर जे लोक पाळतात ते काय करतात. दृष्ट काढणे हा तसाच प्रकार. ती काढून जाते का ? पण काढल्याबर आपल्याला काहीतरी फरक जाणवतो ते कसे काय ?

आपल्या हातून मांजर मारले जाणे म्हणजे महापाप. त्यासाठी चांदीचे मांजर करून काशीला जावे लागते. याचा संबंध काय ? मानव हा प्राणी मुळातच भित्रा आहे. एखादी पूजा करायची राहिली तर आपल्याच हातून काहीतरी चूक झालीय असे वाटते. पण काही घटना सारख्याच लागोपाठ घडल्या तर मन भयभीत होते पण त्याचे उत्तर देणे कुणाला शक्य होत नाही.

तीन माणसांनी एखाद्या कामात एकत्र जाऊ नये. नाहीतर काम होत नाही. औक्षण असो वा अन्य काही, पण तीन हा आकडा वर्ज्य मानला जातो.

आमावस्येला बाहेर जाऊ नये. संध्याकाळी स्त्रियांनी केस सोडून बाहेर जाऊ नये, सोमवारी न्हाऊ नये, शनिवारी तेल आणू नये, शनिवारी केस, नखे कापू नयेत. अशा अनेक गोष्टी आपल्या पूर्वजांपासून चालत आल्या आहेत.

आपोआप हातातून कुंकू-गुलाल काढणे, अंगात येणे. या गोष्टींसाठी अंधश्रध्दा निर्मूलन समिती हे कसे घडते. यात दैवी चमत्कार नाही हे सतत दाखवून देत आहे. बुवाबाजींचे प्रकार असेच वाढत आहेत. कित्येक बुवा भगवी कफनी घालून A.C.रूममध्ये बसलेले दिसतात. असा परमेश्वर खरोखर मानवी शरीरात येतो का ?

श्रध्दा असावी जरूर असावी. आपल्या पेक्षा एक महान शक्ती आहे. तोच विधाता आहे पण तोच मानव झाला तर त्याचे महात्म काय ? आपण देवांच्या पौराणिक कथा एकतो, वाचतो त्यातून आपण काय घेतो ? ईश्वर मनवाचा आदर्श आहे पण तो मानव नाही.

अजूनही इच्छापूर्तीसाठी निरपराध बालकांचा बळी दिला जातो. गरीबांना लुटले जाते. मानवाला उत्तम शरीर, बुध्दी, दोन हात दिलेले असताना मानव अंगारे धुपारे यावर फार विश्वास ठेवतो.

मध्यंतरी बातमी आली एका स्त्रीच्या अंगात साईबाबा येतात. ती बाई गाडीतून फिरते. आलिशान फ्लॅट मध्ये वास्तव्य करते. ती परदेशात होती. इकडे आल्याबर


एका टेक्सींत र साईबाबांचा फोटो पाहिला आणि ओरडली हेच माझ्या स्वप्नात येतात, झालं अख्खा पेडररोड जमला. हजारो माणसे तिच्या दर्शनासाठी. पोलिसांची धावपळ. शिर्डीला साईबाबांचे वास्तव्य होते व आहे असे समजल्या जाणाऱ्या शिर्डीला १०-१० दिवस चालत जातात त्यांच्या स्वप्नात साईबाबा येत नाहीत. आणि जिला साईबाबा कोण होते ते माहीतही नाही अशा स्त्रीच्या स्वप्नात दिसतात, खरचं आश्चर्य आहे !

आज लोकांचे विचार बदलत चालले आहे. विधवा कुंकू लावतात. कारण ते लहानपणापासून लावतात. स्त्रियांना पूजा सांगण्याचा अधिकार आहे. फारच काय मुलांवर संस्कार केला जातो मग तो मुलींवर का नाही ? म्हणून मुलींची मुंज लावण्यात येते.

अंधश्रध्देचा पगडा मनावर असताना मानवाची प्रगती साधणार आहे का ? हे जाणून घेऊन त्याचा शास्त्रीय आधार जाणून घेऊन त्याचा शास्त्रीय आधार जाणून घेऊनच तो स्वीकारावा. एकविसाव्या शतकात आपण पदार्पण केले आहे. शेकडो वर्षे शनिशिंगणापूरला स्त्रियांना प्रवेश नव्हता (चौथऱ्यावर) त्याविरूध्द उठाव होत आहेत. मानवाने जागे होऊन सापेक्ष विचार केला तरच प्रगती साधेल आणि बुवाबाजीला आळा बसेल आणि अडाण्याची लुट थांबेल अनेक वाईट प्रसंग टळतील, त्यासाठी जागृती फार महत्वाची आहे.

**सौ. वंदना प्रसादे**
सिद्धांत, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे.

• • •



# आठवणीतील कवितांच्या आठवणी

क्षमा वैद्य ही विज्ञान शाखेतून गतवर्षीच पदवी प्राप्त केलेली विद्यार्थिनी. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना कवितेतले काय कळते असे सर्वसामान्यांना वाटते. क्षमाला मी मुद्दाम आठवणीतल्या कविता वाचायला लावल्या व त्यावर तुला जमेल तसे लिही असे सांगितले. विज्ञान शाखेची विद्यार्थिनी व जुन्या पिढीतली कवितांचे रसग्रहण हे या लेखाचे खास विशेष. कवितांची तिने केलेली रसग्रहणे आजच्या काव्याचा जोडलेला संदर्भ हा मुद्दाम वाचनीय आहे. विज्ञान शाखेतील शिक्षण घेणारे विद्यार्थीही किती कवी मनाचे, संवेदनाशील असतात हे लेख वाचून समजावे. - संपादक

**प्रास्ताविक :**

जगातील पहिल्या काव्याची निर्मिती ही महर्षी व्यासांनी 'महाभारताच्या' रुपात केली. त्यानंतर महर्षी विश्वामित्रांनी 'रामायण रचले' तसा काव्यनिर्मितीचा ठेवा हा अनादी काळा पासून चालत आला आहे. काव्यनिर्मितीची गरज का पडते ? काव्य हे का निर्माण होते? खरंच 'काव्य' म्हणजे परमेश्वराने मानवाला दिलेले एक वरदानच आहे.

असे म्हणतात की 'जे न देखे रवी ते देखे कवी' जेव्हा खूप वाचणारे मन विचारांनी, कल्पनांनी ओसांडून जाऊ लागले की मग आपोआपच कोरे कागद ओढले जातात नि लेखणी कागदाशी गुजगोष्टी करु लागते. पु.ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे आपल्याला डोळे दिले आहेत, कान दिले आहेत, तोंड दिले आहे, पण त्याचा उपयोग कसा करावा ह्याचे शिक्षण मिळण्याची सोय मात्र कुठे नाही. एखादी उत्कृष्ट काव्यनिर्मिती म्हणजे आपल्या ज्ञानेंद्रियांचा खराखुरा उपयोग !

काव्याच्या व्याख्या आजवर अनेक संस्कृत, इंग्रजी, मराठी साहित्यशास्त्रकारांनी केल्या आहेत. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्।' असे विश्वनाथ पंडित म्हणतात. तर जगन्नाथ पंडित म्हणतात, रमणीय अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दाला काव्य म्हणावे. कोणी तालबद्ध रचनेला काव्य म्हणतात. तर कोलरिजच्या मते 'उत्कृष्ट शब्दांची उत्कृष्ट रचना' म्हणजे काव्य. प्रसिद्ध कवी वर्ड्स्वर्थच्या मते 'उत्कट भावनेचा सहजोद्रेक' म्हणजे काव्य, तर कुणी म्हणते की जीवनावर केलेले भाष्य म्हणजे काव्य. तर कुणाच्या मते 'जे हृदयाला भिडते, हलविते, फुलविते ते काव्य ! अशा प्रकारे महान कवींनी काव्याला आपापल्या विचारांच्या साच्यात बसविले.

खरोखर काव्यामुळे माणसाला एक दृष्टिकोन प्राप्त होतो. शृंगार, वीर, करुण, रौद्र, हास्य, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत असे काव्यांचे रस आहेत.

खरे तर काव्यनिर्मितीवर काळाचे बंधन नाही. पण नीट पाहिले असता पूर्वीचा काळ म्हणजे ज्या काळात रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये रचली गेली तो काळ, नंतर मधला काळ म्हणजे मनाचे श्लोक, छत्रपती शिवाजी महाराजांवरील शौर्यगीते, केकावल्या, वेचे, अभंग, लावणी यांची निर्मिती झाली तो काळ, आणि आताचा काळ की ह्या काळात जास्तीत जास्त राजकारण, भ्रष्टाचार, दुःख, हिंसा, प्रेमभंग किंवा प्रेमावरील काव्यांची जास्तीत जास्त निर्मिती झाली.

थोडक्यात काय जरी काळाप्रमाणे कवितेत स्थित्यंतरे होत गेली असली तरी ह्या ९ रसांपैकी काही

ठराविक रस हे त्या काळापुरते राहिले. म्हणजे त्या काळातील काव्यातून त्या वेळच्या समाजाचे, माणसांचे, त्यांच्या स्वभाव विभावाचे वर्णन त्या त्या काळात होत गेले.

**आठवणीतील कवितांच्या आठवणी**

'आठवणीतील कविता' म्हणजे आजच्या नव्या पिढीतील जसे आम्ही आहोत त्याप्रमाणे आमचे आजी-आजोबा, पणजी पणजोबा ही जुन्या पिढीतील मंडळी तरुण असतानाच्या कविता.

'आठवणीतील कविता' ची निर्मिती ही कळतनकळत होत गेली. जसा रेशमाचा एक एक धागा गुंफत जाऊन सुंदर, तलम, वस्त्र तयार होते तसेच ह्या कविता एक एक करुन एकत्र येऊन ह्या कवितासंग्रहांची निर्मिती झाली.

कीर्ती महाविद्यालयाच्या बाजूलाच वीर सावरकर पथावर असलेल्या स्टेट बँकेच्या शाखेचे कार्यकुशल पदाधिकारी श्री. पद्माकर महाजन यांना काव्य, कला व इतर अनेक सांस्कृतिक विषयात रस असल्याने या शाखेत आल्यावर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांची ये जा चालू झाली. काही प्राध्यापक मंडळीत नित्याची ऊठबस होऊ लागली. ओळखी होऊ लागल्या. नवीन माहिती, काहीतरी शंका कसलातरी शोध यात त्यांना विशेष रस. त्यांच्याप्रमाणेच ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. दिनकर बर्वे यांनाही या प्रकारच्या कामात तितकाच रस आणि शोध घेण्याची तितकीच चिकाटी.

एकदिवस महाजन घाईघाईने बर्व्यांकडे आले आणि म्हणाले, '' पद्दू आजारी मौज वाटे भारी ही '' ही सगळी कविता हवी आहे. महाजनांच्या परिचितांचे सहृद अमेरिकेत राहत होते. त्यांचा नातू आजारी असताना पद्दू आजारी ही गंमतीची कविता त्या सहृदांना आठवली होती आणि म्हणून ती मिळवायची तीव्र ओढ त्यांना लागली होती.

तेथे काही प्राध्यापक मंडळी बसली होती. कविता सगळ्यांच्याच परिचयाची होती. म्हणून कोणत्या कवीची ती कविता आहे याचा अंदाज घेऊन काव्यसंग्रहातून ती शोधता आली तर पहावी अशी कल्पना निघाली व सर्व संभाव्य कवींची नावे आठवू लागले.

आणि अशाप्रकारे आठवणीतील कविता ह्या काव्यसंग्रहाच्या निर्मितीचे बीज पेरले गेले. संदर्भ विभागातील सर्वजण कवितेचा शोध घेऊ लागले. पण ती अजून मिळतच नव्हती. तेव्हा ती कविता सहज उपलब्ध होणार नाही असे लक्षात आले. पण ती कविता सर्वांनाच ठाऊक आहे व सर्वांना तिच्या शोधात रस वाटतोय असा अनुभव सर्वांनाच झाला. आणि कवितेचा शोध चौफेर सुरू झाला. कुणी आपले नातेवाईक गाठू लागले. कुणी प्रौढ व्यक्तींना गाठू लागले. हा सगळा शोध आपापली कामे सांभाळून गमतीने चालला होता. त्यात कसलाही ताण नव्हता. पण त्यात अनेकजण रंगले होते.

अखेर कवितेचा शोध लागला तो कॉलेजच्या शेजारी राहणारे सुप्रसिध्द संशोधक व समीक्षक गुरुवर्य कै. डॉ. स. गं. मालशे यांच्याकडे. ते अनेकवर्ष कॉलेजमध्ये शिकवीत होते. व पुस्तकांसाठी अजूनही त्यांचे कॉलेजमध्ये येणे जाणे चालू होते. त्यांच्या संग्रही असणाऱ्या नवयुग या पाठ्यपुस्तकात ती कविता आढळली. ती भानुदास या टोपणनावाखाली छापली होती. भानुदास म्हणजे श्री कृष्णाजी विनायक पोटे नामक एक व्यक्ती होते. कविता सापडताच श्री. बर्वे व महाजन यांना अतिशय आनंद झाला. तेव्हा श्री. बर्वे, श्री. महाजनांना म्हणाले, महाजन, शोध संपला म्हणून तुम्हांला चैन पडत नसेल.. थांबा तुमच्या मागे दुसऱ्या एका कवितेच्या शोधाचा झक्कू लाऊन देतो. आणि ती कविता म्हणजे 'कावळा म्हणे मी काळा! पांढरा शुभ्र तो बगळा! दिसतसे....' कोणाची आहे ही कविता ते शोधा.

श्री. महाजनांना रस्त्याच्या फुटपाथच्या कडेला असलेली जुनी पुस्तके घेऊन त्यांचा संग्रह करण्याचा छंद होता. त्या दिवशी दुपारीच त्यांनी श्री. बर्व्यांना हर्षभरित होऊन ती कविता दिली. आणि तेथे गप्पा मारत असलेल्या विविध प्राध्यापक मंडळींमध्ये अनेक शालेय कवितासंबंधीच्या आठवणी जाग्या होऊ लागल्या. पावसाच्या पहिल्या सरीने उमललेला मृद्‌गंध हवेत सर्वत्र पसरल्यावर वातावरण उल्हसित झाल्याप्रमाणे काहीतरी किमया अकस्मात घडून आली. हा सर्व प्रकार पाहून शाळेतल्या पुस्तकातल्या अशा आठवणाऱ्या कविता सगळ्या एकत्र गोळा करुन ठेवल्या तर....? अशी कल्पना महाजन व बर्वे यांच्या डोक्यात आली. दोघांमध्ये रसवृत्ती, कष्ट व चिकाटी सारखीच असल्यामुळे दोघेही जुन्या कविता गोळा करण्याच्या नादाला लागले. निरनिराळ्या वयाच्या, पिढीतल्या, व्यवसायातल्या, विचारांच्या, अभिरुचीच्या व्यक्ती यात सारख्याच समरसतेने रंगल्या. अशा प्रकारे चारशे-पाचशे कविता ते बघता बघता गोळा करतात.

हे सर्व चालू असताना अनेक विषयात रस असलेले व अनेक कार्यक्रमात सहभागी होणारे 'राज्यशास्त्र' या विषयाचे अभ्यासक आणि त्या विभागाचे प्रमुख, उपप्राचार्य प्रा. एकनाथ साखळकर यांना या विषयात आस्था निर्माण झाली आणि हे सगळे परिश्रम वाया जाऊ नयेत सर्वांना त्याचा लाभ व आनंद मिळावा यासाठी हे सगळे संकलन पुस्तक रुपाने प्रकाशित करावे अशी कल्पना त्यांनी मांडली व त्याचा पाठपुरावा करुन मोठ्या हिरिरीने त्यात सहभागी झाले. एक छंद म्हणून सुरु केलेल्या उपक्रमाला साखळकरांच्या या प्रयत्नाने वेगळीच दिशा लाभली. खुद्द श्री. (कै.) रमेश तेंडुलकरही हळूहळू कवितेवरील प्रेमामुळे व सर्वांशी असलेल्या स्नेहसंबंधामुळे या जाळ्यात ओढले गेले. व्यावहारिक बाजूची जाण शून्य. पण प्रकाशनाच्या कल्पनेचं स्वागत केलं गेलं.

तथापि कोणी प्रकाशक गाठण्यापेक्षा आपणच या कविता प्रकाशित कराव्यात असा धाडसी विचार साखळकर-महाजनांच्या डोक्यात आला आणि त्यांनी तो विचार पक्का केला. यामध्ये व्यवहार अजिबात नव्हता. प्रेम होते ते शाळेतल्या कवितांवर व ते जतन करणाऱ्या वाचकांवर. हा वाचक वर्गच त्यांचा मुख्य ग्राहक होता. व हा आनंदाचा ठेवा वाचकवर्गाला माफक किंमतीत मिळावा व वाचकांचे त्याच्याशी प्रेमाचा संबंध निर्माण व्हावा हा मूळ हेतू. व या सगळ्यातून फक्त साठ रुपयात हे ३ भाग देण्याचे ठरले.

आनंदाची गोष्ट म्हणजे या रसिक मंडळींच्या योजनेला विविध स्तरांतून अनुकूल प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ विदुषी दुर्गाबाई भागवत, माननीय पु.ल. देशपांडे, कवयित्री शांताबाई शेळके, प्रा. प्रदीप कर्णिक यासारख्या मान्यवर व थोर मंडळींचे हात या कामाला लागले.

व्यावहारिक बाबतीतही असाच स्वयंस्फूर्त प्रतिसाद मिळाला. कमिशन न घेताच या पुस्तकाची विक्री करायाचा मनोदय काही वितरकांनी व्यक्त केला तर काहींनी माफक दरात मुद्रण करायची तयारी दर्शविली. शासकीय व इतर प्रकारची अनुदाने मिळवून देण्यात पुढाकार घेण्याचे काही व्यक्तींनी मान्य केले. या प्रतिसादात रद्दी विकणाऱ्या छोट्याशा दुकानापासून ते मोठ्या उद्योगसमूहात आर्थिक सल्लागार म्हणून उच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीपर्यंत सर्वांची साथ मिळाली. हा एक अत्यंत सुखद व सतत उत्साह देणारा अनुभव होता. परभाषेतील मंडळींनाही प्रथम या कामाचे स्वरुप लक्षात आले नाही तरी आर्थिक मदतीचा हात द्यायला ते पुढे येऊ लागले. तसेच या योजनेला वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळाली. अशा प्रचंड प्रतिसादामुळे या योजनेला बघता बघता जाहीर स्वरुप प्राप्त झाले.

पूर्वीच्या काळी शाळेतील कवितांच्या जोडीला त्या वयात इतरही गाणी, कविता, समसमारंभ, मेळ्यातून,

सार्वजनिक कार्यक्रमातून म्हटली जात. अंगाईगीत, बालगीत, भक्तिगीत, सणांची गाणी यांचा समावेश काही उजळणींच्या पुस्तकात असे. तेव्हा यांचासुद्धा समावेश करण्याचे त्यांनी ठरविले. शाळेत अभ्यासाला लागणाऱ्या पण प्रौढपणी केवळ मधुर स्मृती होऊन अंतःकरणात राहिलेल्या पाठ्यपुस्तकातील कवितांचे हे चार भागांचे संकलन या 'आठवणीतील कविता' या पुस्तकात केले गेले. अशा प्रकारे 'आठवणीतील कविता' याचे संपादक श्री. पद्माकर महाजन, श्री. दिनकर बवे, श्री. रमेश तेंडुलकर व श्री. राम पटवर्धन यांनी 'old is gold' या उक्तीला अनुसरुन कवितांचा अमूल्य ठेवा वाचकांसाठी खुला केला.

**आठवणीतील कवितांतील विविधता :**

'आठवणीतील कविता' या विविध विषयांच्या, विविध पैलूंनी सजलेल्या आहेत. यात सृष्टी निर्माण करणाऱ्या व कर्ता करीता असणाऱ्या परमेश्वराच्या मधुर, हृदयस्पर्शी कविता आहेत. आईच्या कविता आहेत. हिंदुस्थानचा इतिहास घडविणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई, पेशवे यांची गाणी व पोवाडेदेखील आहेत. सह्याद्रीच्या कुशीत असणाऱ्या महाराष्ट्राची महाराष्ट्रगीते आहेत. गुराखी, भिल्ल, कोळी यांची गीते आहेत.

राम, कृष्ण, अर्जुन, कर्ण यांची गीते आहेत. 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' असे मनाला पटवून देणाऱ्या निसर्गराजाची गाणी व कविता आहेत.

त्याचप्रमाणे बोबडी बालगीते व छोट्या दोस्तांचे साथीदार काऊचिऊ यांची गाणी आहेत. अनेक अन्योक्त्या आहेत. याशिवाय रोजच्या व्यवहारातल्या संपर्कात येणाऱ्या गोष्टीतून वाचकांना उपदेश करणाऱ्या उपदेशकवितांचा समावेशही यात केला आहे.

**देवभक्ती :**

श्री शारदेला वंदन करुन सर्वप्रथम श्री शारदा या कवितेने काव्यरसाचा आस्वाद घेण्यास सुरवात करु. व 'आठवणीतील कविता' या काव्य संग्रहातील कवितांचा प्रवास चालू करु.

ज्याप्रमाणे फुलांची एकेक पाकळी ऊमलत जाऊन एक सुवासिक फूल फुलते व त्याच्या गंधाने आजूबाजूचे वातावरण सुगंधित होते तसेच या कवितासंग्रहातील एक एक विषय पाकळीप्रमाणे उलगडून त्यातील काव्याचा आस्वाद घेऊ. शुभ्रवस्त्रांकीत श्री शारदेची स्तुती करताना कवी गिरिश म्हणतात,

ध्यानस्थ झाले तुझ्या आदिरुपामध्ये विश्व हे गायनी डोलुनी
संसारादुःखामध्ये पोळलेले येथे बैसती अंतरे खोलुनी

प्रत्येकाच्या मनोभूमीवर आपली कृपादृष्टी करणाऱ्या या मातेला आळवताना कवी म्हणतात,

'जीवा हवे ते सापडेना, म्हणुनी तुझ्या रंगलो चिंतनी
माते ! मनःशांततेची दुधा या जीवा पाजवी गीतगंगेमधूनी'

तर कवी गोविंद सरस्वतीची भूपाळी आळवतात व चित्तमयुरावर विश्वकाव्य वाचीत बसलेल्या या वागेश्वरीची स्तुती करताना म्हणतात,

सौंदर्याहून दिव्य दिव्यतर हिचे ज्ञान सुंदर
खरोखर ! हिचे ज्ञान सुंदर या ज्ञानाहून जगात सुंदर एकच परमेश्वर !

देवीकडे मनाचा विकास होऊन प्रत्येकाच्या आत्मवेलीवर बुद्धीची फुले विकसित होऊ दे असे वरदान कवी मागतात.

अनेक कवींनी परमेश्वरावर अनेक सुंदर काव्ये केली आहेत. त्या परमेश्वराची स्तुती करताना वेगवेगळे

कवी काय म्हणतात ते पाहू,

या परमेश्वराला आळवताना संत तुकाराम म्हणतात,

कां रे नाठविसी कृपाळू देवासी ।
पोसितो जगासी एकला तो ॥

या विश्वाची चिंता करून विश्वाला पोसणाऱ्या परमेश्वराची स्तुते करावी कारण त्यांच्यामते हे जग परमेश्वरनिर्मित आहे. आणि त्याच्या सत्तेनेच हे जग चालते असे त्यांचे म्हणणे आहे. तर काही या ध्यानाकडे तू आम्हाला कधी एकटे सोडून जाऊ नको अशी प्रार्थना करतात व तुझी दृष्टी सदोदित आमच्यावर राहावी असे आळवितात. तर काहींना परमेश्वर हाच आपला त्राता वाटतो. म्हणून ते त्याला प्रार्थना करतात,

सर्व संकटांपासून देवा । मुक्त करी झडकरी ॥

तर हे सुंदर विश्व, सुंदर आकाश, वेली, झाडे, फुले पाखरे निर्माण करणारा परमेश्वर स्वतः किती सुंदर असेल असे म्हणताना कवी ग. ह. पाटील म्हणतात,

इतुके सुंदर । जग तुझे जर ।
किती तू सुंदर असशील!

तर परमेश्वराला मायबाप समजणारे काही कवी त्याचे रुप पाहण्याची उत्कट इच्छा प्रकट करताना म्हणतात,

आस ही तुझी फार लागली ।
हे दयानिधे दे बुद्धी चांगली ॥
देऊ तू नको दुष्ट वासना ।
तूच आवरी माझिया मना ॥

तर श्री हरीला जन्मजन्मांतरीचा दास होण्याची प्रार्थना ईश्वराकडे करतात.

कवी भास्कर दामोदर पाळंदे या देवाची प्रार्थना करताना म्हणतात,

आम्हाला सुखाने भवाब्धी तराया ।
कृपेची तुझ्या नाव दे देवराया

स्वतःला मतिमंद व बुद्धीहीन मानून त्या परमेश्वराला म्हणतात,

तुला वंदी मी दास देवराया
नसे बुद्धी तव स्तुस्ती कराया

विष्णू मोरे, महाजनी कोणास न दिसणाऱ्या या ईश्वराच्या प्रातःस्तोत्रात म्हणतात,

निवास तव कोणता कळतसे न निश्चये
स्वरुप नचही दिसुनि चर्मचक्षूंसये

तसेच ईश्वराचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, ह्या पृथ्वीवर जे प्राणी आहेत, ह्या समुद्रात जे मासे आहेत व इतर जीव आहेत, आकाशात भरारी मारणारे इतर पक्षी आहे ही सर्व ह्या प्रभूची आहेत व त्यांना ते ईश्वराला अहर्निश भजण्यास सांगतात. त्याच प्रमाणे हे सूर्य, चंद्र तसेच ग्रहतारे आहेत त्यांना सदोदित तुम्ही ईश्वराचे गाणे गात रहा असे सांगतात. अशा प्रकारे ज्या गोष्टी ईश्वर निर्मित आहे त्या सर्वांना ते, ईश्वराचे आभार मानून त्या ईश्वराचे गीत सदोदित गायला सांगतात.

तसेच कुसुमाग्रजांनी सकाळी गाई वळवणाऱ्या व आपल्या वासरीने ह्या सृष्टीला मंत्र मुग्ध करणाऱ्या, ह्या श्रीकृष्णाला,

ये रे माझ्या नंदबाळा, हृदयाच्या राऊळी, राऊळी

असे आळवले आहे. तर कवी अनंतानी आपल्या गोपी-गीतातून श्री कृष्णाच्या दिनचर्येचे खूप छान वर्णन केले आहे. मध्वमुनीश्वरांनी श्री कृष्णाने गोकुळ

सोडल्यानंतर गोकुळ वासियांची तसेच यशोदा व नंदाची जी अवस्था झाली त्याचे सुरस वर्णन केले आहे आणि यात त्यांनी म्हटले आहे,

उद्धवा शांतवन कर जा। त्या गोकुळवासी जनांचे ॥

तर कवी वा. भ. बोरकरांच्या मते देव माणसाच्या ह्रदयमंदिरी बसलेला असतो. जेथे लोक सुखाने संसार करतात, आपल्या बालकांचे संगोपन करतात, जेथे शेतकरी घाम गाळून मोती पिकवता, जे लोक आपल्या हास्याने चैतन्य फुलवतात, ज्यांचे शब्द हे दीपासारखे दिव्य असतात व भवितव्य ऊजवळणारे असतात अशा ठिकाणीच देव बसलेला असतो व तेथेच अशा देवाची प्रचीती येते आणि म्हणून ते म्हणतात,

दिव्यत्वाची जेथे प्रतीती, तेथे कर माझे जुळती

सोपान देव चौधरी यांनी देवाच्या ह्या कवितेत एका महार भक्ताचे वर्णन केले आहे. पूर्वीच्या काळी महार मांगाना मंदिरात प्रवेश नसे. म्हणून हा चोखा रामजन्माच्या दिवशी देवळाच्या बाहेर ऊभा राहूनच देवाची भक्ती करतो व त्याच्या नामाचा 'जय जय रामकृष्ण हरी' असा गजर करतो व मंदिराचे अंगण आपल्याला झाडायला मिळते हेच भाग्य मानून आपल्या जवळील हार प्रभुकंठी घालण्याची विनंती करतो.

तेव्हा जातीने महार असला तरी हाच खरा ब्राह्मण आहे असे सांगताना सोपान देव म्हणतात,

'कितिक पापी जन मंदिरात येती
लोक लाजेस्तव राम नाम घेती
तुझ्या भेटीची आस जया भारी
खरा ब्राह्मण तळमळे पहा दारी '

कवी भा. दा. पाळंदे 'प्रभो प्रणत वत्सला' यात देवालाच सर्वस्व मानून लोक कितीही चुकले तरी तूच आम्हाला क्षमा करणार आहेस अशी आशा व्यक्त करतात. तर संत 'एकनाथ 'दत्तांनी केलेले गुरु' ह्यात श्री दत्तांना ज्यांचा ज्यांचा गुण भावला, त्यांना त्यांना आपले गुरु केले याचे वर्णन आहे.

अशा प्रकारे देवाचे वर्णन निरनिराळ्या कवींनी निरनिराळे केले आहे.

पण नव्या पिढीतील आम्हाला देवाचे वर्णन, कथा, गोष्टी ह्या पूर्वीसारख्या फार थोड्या प्रमाणात ऐकायला मिळतात. कारण जसा काळ बदलत गेला त्याप्रमाणे देवाची व्याख्याही बदलत गेली. दगडात पूजला जाणारा देव हा हळूहळू मानवात दिसायला लागला व त्यातूनच,

देह देवाचे मंदिर, त्यात आत्मा परमेश्वर

अशा काव्याची निर्मीती झाली.

स्वातंत्र्य पूर्व काळात मातृभूमीलाच देव मानण्यात आले, तर स्वातंत्र्या नंतर जशी जशी आधुनिकता देशात येऊ लागली तस तसे कष्ट हाच देव मानण्यात आला व आता २१व्या शतकात 'संगणक' हाच देव होऊ पहात आहे.

आज जरी टी.व्ही. वर देवांच्या असंख्य मालिका, भजनाच्या, मंत्राच्या कॅसेट ह्या गोष्टींद्वारे जरी देवाची भक्ती प्रदर्शित होत असली तरी त्यामागे कुठे तरी व्यवहार आहे. पूर्वीसारखा निरपेक्ष भक्तीभाव त्यात नाही. एवढेच काय देवाच्या नावाखाली राजकारण देखील खेळले जाते. पूर्वीच्या किती तरी अंधश्रद्धा मिटवल्या असल्या तरी, खेडोपाड्यातून बळी देण्यासारखे प्रकार चालूच असतात. आणि ह्या गोंधळात माणूस विसरतो की देव हा भावनांचा भुकेला मुरारी आहे. त्याला दागदागिने, मोठ मोठ्या महाआरत्या किंवा प्राण्यांचे बळी ह्यांची तहान नाही तर त्याला भक्तीची, श्रद्धा व प्रेम ह्याची गरज आहे व हेच जर

माणसाला समजले नाही तर,

कुठे शोधीशी रामेश्वर, कुठे शोधीशी काशी
हृदयातील भगवंत राहीला, हृदयातून ऊपाशी

असे म्हणावे लागेल. म्हणूनच,

देह देवाचे मंदिर। त्यात आत्मा परमेश्वर

ही जाण आम्हा नव्या पिढीतील लोकांना आली पाहिजे.

**आईवरील कविता :**

'आठवणीतील कविता' ह्या पुष्पाची दुसरी पाकळी म्हणजे, आईवरील कविता. वेगवेगळ्या श्रेष्ठ कवींनी आई विषयी अतिशय सुंदर सुंदर रचना केल्या आहेत.

कवी भा. दा. पाळंदे यांनी थोर तुझे उपकार ह्या कवितेत आईने बालक वाढवताना त्याचे संगोपन कसे केले याचे यथार्थ वर्णन केले आहे. वर्णन करताना ते म्हणतात जर बाळाला भूक लागली तर ती प्रेमाने त्याला पाजते जर त्याला झोप आली नाही तर त्याला अंगाई गीत म्हणून झोपावते. त्याला दुखणे आले तर रात्रंदिवस जागून त्याला बरे करते. आपल्या दुर्बल बालकाचे रक्षण करते व हेच ममतेचे उपकार स्मरणात राहून तिच्या ममतेची जाणीव राहावी म्हणून ते म्हणतात.

स्मरण तुझ्या या दृढ ममतेचे ॥
होते वारंवार ॥
नित्य करावे साह्य तुला मी ॥
हा माझा अधिकार

'आई ' या कवितेत आईची थोरवी गायली तर आहे व

निज न ये तर गीत म्हणावे । अथवा झोके देत बसावे
कोण करी हे जीवभावे ? ती माझी आई

वि. दा. भाटे यांनी

आम्हा आठवशील ना ? या कवितेत आपल्या भूमातेलाच आई म्हटले आहे. व तिच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातना व्यक्त केल्या आहे व स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढताना शहीद झाल्यावर तू आम्हा आठवशील ना ? असा प्रश्न तिला केला आहे व त्यात ते म्हणतात,

घडल्या असतील चुका घडोत
देह तुझ्या कारणी पडोत
प्राण तुझ्या पुजनी रमतो
जगताना वा मरताना !

अशा प्रकारे ही आई समान असलेली भूमाता इतकी महान आहे की आपले प्राणसुद्धा अर्पण करण्यासाठी कवी तयार आहे.

कवी माधव ज्युलीयन विरह सहन न झाल्याने तिच्या विषयी म्हणतात की आई तू माझ्यापासून खूप दूर आहेस मी आता इथे स्वतःला एकटा पहात आहे. ममतेने माझ्या पाठीवर हात फिरवून माझ्याशी मोकळे बोलणारं माझी विचारपूस करणारं इथे कोणी नाही. जेव्हा या गोष्टी मला आठवतात तेव्हा माझे डोळे भरून येतात.

कवी कुंज विहारी यांनी ' भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढताना फाशीची शिक्षा सुनावलेल्या एका क्रांतिकारकाचे वर्णन केले आहे.

आपला एकुलता एक लाडका बाळ हा फाशीवर जात आहे हे पाहून ती माता आक्रोश करून रडत आहे तेव्हा समजुत घालताना तिला उद्देशून कवी म्हणतात,

मनि धीर धरी, शोक आवरी जननी । भेटेन नऊ महिन्यांनी ।

आपल्या आईची समजूत काढताना क्रांतकारी म्हणतो की, तुझा शोक हा फुकट आहे. मला नेण्यासाठी जे सरकारचे चाकर आले आहे ते यमदूता सारखे आहे. त्याचे काळीज हे उलटे नसले तरी ते अन्नाचे शर्मिंदे आहे. यांनी जरी तुझ पासोन ओढून नेले तरी तू घावरू नको मी पुन्हा तुला नऊ महिन्यांनी भेटेन.

आलेल्या मरणाला न भिता पुढे क्रांतिकारी म्हणतो मला मरणाचे भय नाही पण दुःख इतकेच वाटते की तुझी सेवा करायला मुकलो आहे. तो क्रांतिकारी पुढे म्हणतो, तू मला नऊ महिने वाढविले, बाळपणी संगोपन करून मोठे केले व मोठेपणी संसार थाटून दिला, पण मी अभागी! तुम्हाला वृध्दापकाळी सांभाळण्या ऐवजी तुम्हालाच माझ्या कुटुंबाला सांभाळावे लागणार आहे व एवढे असून सुद्धा, आशावाद ठेवून क्रांतिकारी म्हणतो,

लाभते ज्या, वीर-मरण भाग्याचे । वैकुंठपदी तो नाचू दे
जन्म मला मातृभूमीचे पोटी । पुन्हा पुन्हा मरण्यासाठी
मागेन हेच श्रीहरीला, मातृभूमी उद्धारण्याला
स्वातंत्र्य वरणी लढण्याला तवा शुभ उदरी,
जन्म पुन्हा घेवींनी ।
भेटेन नऊ महिन्यांनी ।

कवी यशवंतांनी आपल्या आई या कवितेत आई नसलेल्या एका मुलाचे वर्णन केले आहे. आई विना हा मुलगा पोरका आहे व जेव्हा दुसरे कोणी आपल्या आईला आई म्हणून हाक मारतात तेव्हा ती हाक मजला शोककारी होते व त्यांचे डोळे पाण्याने भरून येतात व त्यांना वाटते.

जेव्हा चिमणी आपल्या पिलांच्या मुखात चारा घालते, गाय आपल्या वासरांना ममतेने चाटते तेव्हा त्या वात्सल्याला आपण मुकलो आहोत ही कल्पना या मुलाचे काळीज व्याकुळ करते. जेव्हा मी शाळेतून घरी येई तेव्हा मला मायेने पोटाला धरणारे कुणी नाही. मला जेवण भरवणारे, माझ्या उष्ट्या मुखाचे चुंबन घेणारी मला जीव लावणारी आई मला नाही ही जाणीव या मुलाच्या हृदयाला भोकं पाडते. सायंकाळी दिवे लागणीच्या वेळी आम्हाला शुभंकरोती सांगणारे कुणी नाही व आईचा विरह सहन न होऊन कवी म्हणतात,

हे गुंतले जीवाचे, पायी तुझ्याच धागे
कर्तव्य माऊलीचे, करण्यास येई वेगे
हसणार मी न आता, परी येइ आई वेगे.

तर कवी वा. गो. मायदेव यांनी तिथे माझी असणार नाही आई या कवितेत, आईची तुलना कुठल्याच सुखाशी होऊ शकत नाही हे समर्पक पणे मांडले आहे. या कवितेत एक बाई एका मुलाला विविध प्रकारचे आमिष दाखवते व त्याला आपल्या घरी नेण्याचा हट्ट करते. पण तिथे सर्व सुखे असतील पण तिथे माझी आई असणार नाही, हे सांगून तो मुलगा येण्याचे टाळतो. अशाप्रकारे आईच्या थोरवीचे वर्णन कवींनी केले आहे.

कवी दत्तात्रय कोंडो घाटे यांनी आपल्या निज निज बाळा या कवितेत एका अशा मातेचे वर्णन केले आहे की जिची घरची परिस्थिती अतिशय बिकट आहे.

आपल्या बाळाला झोपवताना ती त्याला सांगते सूर्य मावळून आता अंधार पडला आहे, रात्र झाली आहे. तू झोपून घे. नंतर ती त्याला म्हणते आपल्याकडे तिही दारिद्र असले तरी माझ्यात प्राण असे पर्यंत मी तुझी काळजी घेईन व नंतर त्याला म्हणते जरी मी तुला जन्म दिला असला तरी तुझ्यासाठी काही ठेवले नाही पण खरी शिकवण देताना ती माता म्हणते,

तुज ज्ञान नसे अज्ञानविण काही
भिक्षे विण धंदा नाही
तरि सोडुं नको सत्याला

भावि भज दीनदयाळा
मग रक्षिल तो करूणासागर, तुजला
नीज नीज माझ्या बाळा !

भा. रा. तांबे यांच्या हे कोण गे आई ? या कवितेत चिमुकला बाळराज आईला अनेक प्रश्न विचारतो व शेवटी

उरांत धडधडे । धावता मी पडे
पळालो तेथून । कोण ये मागून

असे विचारून आपल्या आई वरचे प्रेम व्यक्त केले आहे.

अशा प्रकारे आईवरच्या कविता या संग्रहात आहेत.

आजच्या दृष्टिकोनातून पहायचे झाले तर स्त्री ही केवळ चूल व मूल या चौकटीत नाही. आजची स्त्री ही स्वावलंबी झाली आहे. असे, म्हणतात की एक आई किंवा घरातील कर्ती स्त्री शिकली तर एक व्यक्ती न शिकता पूर्ण कुटुंब शिकते व अशी अनेक कुटुंबे शिकून समाज शिकतो. आज कालच्या आया ह्या मुलांना अंगाई गीत किंवा गोष्टी सांगून झोपवत नसल्या तरी कामाकरिता बाहेर पडलेल्या आईची मनःस्थिती ही " घार हिंडते आकाशी पण चित्त तिचे पिला पाशी " अशी आहे. पूर्वी स्त्रिया घरात असायच्या पण आज गोष्ट वेगळी आहे स्त्री ही पैसे कमविण्यासाठी बाहेर जाते तेव्हा घरातील मुले पाळणाघरात जातात. पण याचा अर्थ असा नसतो की आईचे आपल्या मुलाकडे पूर्ण पणे दुर्लक्ष झाले आहे. आजही ती कितीही कमवणारी स्त्री असली तरी प्रेम हे तेवढेच आहे. फक्त ते व्यक्त करण्याचे मार्ग बदललेले आहेत.

**मातृभूमीच्या कविता**

मातृभूमी कोणाला प्रिय नसते ? मातृभूमीचे व तेथे जन्मणाऱ्या व्यक्तीचे ऋणानुबंध असतात. मातृभूमीच्या जमिनीवर पावसाचे पाणी पडून तिच्या श्वासाचा जो सुगंध सर्वत्र दरवळतो तो सुगंध माणूस हा आपल्या मनात साठवून ठेवतो. आणि म्हणूनच मग, देश पारतंत्र्यात असताना, ह्या मातृभूमीपासून दूर काळ्यापाण्याची शिक्षा भोगायला गेलेले वि. दा. सावरकर यांच्या हृदयातून काव्य जन्माला येते व ते म्हणतात,

ने मजसी परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला !

तर कवी श्री कृ. कोल्हटकर म्हणतात,

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

तर,

महासिंधू याला असे पाठीराखा, तसे सह्याचलाचे कडे !
खडे दुर्ग साल्हेर, फोंडा परांडा, अशेरी असे दक्ष चोहीकडे
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणी देही,परी लोहपाणीही अंगात या
नद्या न्हाणिती तापि,कृष्णा नि गोदा, भिमा मांजरा वैनगंगा तथा !

असे माधव ज्युलियन, महाराष्ट्राविषयी म्हणतात. अशी ही मातृभूमी जेव्हा पारतंत्र्यात होती. तेव्हा देशातील लाखो करोडो माणसे आपल्या या मायभूमीच्या पारतंत्र्याच्या बेड्या तोडायला सज्ज झाले आणि अनेकांनी आपले बलिदान देऊन या मातृभूमीला स्वतंत्र केले. त्या सर्वांत अग्रभागी होते श्री छत्रपती शिवाजी महाराज, झाशीवाली राणी, अनेक क्रांतिकारक, अनेक देशप्रेमी नेते.

सर्वांकरता त्यांची मातृभूमी हेच सर्वस्व होते. देशाकरता प्राण अर्पण करण्याची पण त्यांची तयारी होती. त्या काळात देशद्रोह्यांना पण कडक शिक्षा होत असे मग ती अगदी मृत्यूदंडाची पण शिक्षा असे. पण हेच जर

आजच्या युगात पाहिले तर आज या देशावर प्रेम करणारे फार थोडे लोक या जगात आढळतात. आज देशाच्या प्रगतीचा विचार करणारी डोकी व मने फार थोडी आहेत व या देशाला विकून आपली पोटे भरणारी ही डोकी व स्वार्थी मनंही खूप आहेत. आज सर्वत्र भ्रष्टाचाराचे भूत थैमान घालते. माणसाने आपले जग हे फक्त स्वतःपुरते मर्यादित केले आहे. त्याच्या मनातून सामाजिक हित व सामाजिक ऐक्याची जाणीव नष्ट होत आहे. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे,

प्रियकर हिंदीस्तान ! अमुचा प्रियकर हिंदीस्तान

हा अलंकार हा भूगोलाचा । यास तसे उपमान ॥

सर्व सुखाची खाण । अमुच्या सर्व सुखाची खाण

हे अभिमानाचे, सौभाग्याचे अमुच्या रम्य निधान॥

असं म्हणणारी मने आज लोप पावली आहेत.

देशप्रेमाचे वारे जेव्हा अशा मनात वाहू लागतात, तेव्हा कवी यशवंतांनी म्हटल्याप्रमाणे

वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती

मन्मना नाही क्षिती ।

भिंतीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडूनी

मुक्त तो रात्रंदिनी ।

असे गाणे ह्या देशप्रेमीच्या मनात रुजू लागते. आज अशाच देशप्रेमींची गरज देशाला वाचविण्यासाठी आहे. जेव्हा देशाच्या, जन्मभूमीच्या प्रेमाने ही हृदये जेव्हा भरतील तेव्हा कवी वासुदेव वामनशास्त्री खरे यांनी म्हटल्याप्रमाणे,

पोटासाठी भटकत जरी दूरदेशी फिरेन

मी राज्याच्या सदनी अथवा घोर रानी शिरेन

नेवो, नेते, जड तनुस या दूर देशात दैव

राहे चित्ति प्रिय मम परी जन्मभूमी सदैव

असे गीत प्रत्येकाच्या ओठावर राहील. या आठवणीतील कविता या कवितासंग्रहात अशा विविध कवितांचा समावेश आहे. या कविता महाराष्ट्रावर आहेत. हिंदुस्थानावर, आहेत. श्री छत्रपती शिवाजी महाराज व झाशीच्या राणी यांच्यावर आहेत. तर,

शत्रूच्या खड्या समशेरी

वाकतो पुणे दरबारी

पेशवे मऱ्हाटी स्वारी

तळपती तिखट तलवारी

असा दरारा असणाऱ्या पेशव्यांवरही आहेत.

मर्दानी झाशीच्या राणीचे वर्णन कवी दु. आ. तिवारी असे करतात,

झाशीच्या कुहरामध्ये सिंहीण निजे घायाळ

गर्जना उठे भवताली स्वातंत्र्येच्छुचा काळ

लावाया भाग्य कसाला तेजस्विनी करी कल्लोळ

बुरुजा बुरुजावर मोर्चे

बांधुनिया तोफांचे

सजविले सैन्य शूरांचे

आपणही वेषे सजली मर्दानी झाशीवाली

अशाच मर्दानी झाशीवालीची गरज आजच्या जगात आहे. देशावरील अन्यायाला झुगारून देण्याची गरज तर आहेच, पण स्त्रियांवर होणारे अन्याय, बलात्कार, हुंडाबळी, मालमत्ता लुबाडणे या सर्व अन्यायाला वाचा फोडण्याची गरज आहे. असे झाले तरच भयमुक्त जीवन सुखाने जगू शकेल.

या झाशीच्या राणी शिवाय श्री छत्रपती शिवाजींवर पण अनेक कविता या ग्रंथात आहेत. कवी साधुदास या बालशिवाजीचे वर्णन करताना, म्हणतात

नाकेला अन गुलजार । सावळा नी सुंदर भासे

कसल्याशा करुनी वेता । मधून मधून किंचित हासे

इवल्याशा त्याच्या देही । सरदारी ऐट विलासे

आणि आज अशाच व्यक्तिमत्त्वाचे पैलू जेव्हा प्रत्येक व्यक्तीत पडू लागतील, तेव्हा वि. दा. सावरकर यांनी म्हटल्याप्रमाणे

नभी नक्षत्रे, एक परी प्यारा

मज भरतभूमीचा तारा

प्रासाद इथे रम्य, परी मज भारी.

झोपडी आईची न्यारी

तिजविण नको राज्य, मज प्रिय साचा

**बालपणीचा काळ**

असं म्हणतात की 'बालपणीचा काळ सुखाचा!' किंवा या बोबड्या बडबडीच्या वयालाच रम्य ते बालपण. असेही म्हणतात. या बालपणीचे वय व दिवस खूप निरागस व निष्पाप असतात. या तान्हुल्यांच्या जगात फक्त त्यांचे आई-बाबा, आजी-आजोबा, व ताई-दादाच नसतात तर इतर मंडळी सुद्धा त्यांच्या जगात असतात. या बालगोपाळांचे जगच वेगळे असते. काऊ-चिऊ, मनी, गोती, कोंबडा, बाहुल्या, पोपट, रानातील पाखरे वगैरे त्यांच्या जगात वावरत असतात. ही सर्व मंडळी या बालगोपाळांशी त्यांच्यासाठी असलेल्या ह्या बालगीतातून त्यांच्याशी गट्टी करतात. व छान-छान गप्पाही मारतात अशा काही ह्या अवखळ, अल्लड वयातील कवितांचा सुद्धा आठवणीतील कवितांमध्ये समावेश आहे.

लहानपणी या लहानग्यांच्या जगात त्यांचे खरे सखे सोबती असतात ते काऊ-चिऊ. आई आपल्या मुलाला जेवण भरवताना या सवंगड्यांची ओळख एक घास काऊचा, एक घास चिऊचा असं सांगून करून देते. या अशाच चिऊवरल कविवर्य कुसुमाग्रज म्हणतात,

उठा उठा चिऊताई । सारीकडे उजाडले

डोळे तरी मिटलेले । अजूनही !

आणि या चिमणीला तिच्या पिलांसाठी चारा आणण्याची आठवण करून देताच ती चिऊताई सुध्दा बाळाचे नाव घेताच पट्दिशी उठते नि चारा आणण्यासाठी दूर भुर्र उडून जाते.

तर भवानी शंकर पंडित हे आपल्या चिऊताईची पिल्ले यात या गोजिऱ्या पिल्लांना समजवतात की अजून तुम्ही लहान आहात जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा तुमच्या पंखात जोर येईल नि तेव्हा तुम्ही भुर्र उडून जाल.

ग. ह. पाटील यांच्या पाखरांची शाळा ह्या कवितेतील एक मुलगा आईला विचारतो की या तारेवर या चिमण्यांची आमच्या सारखीच शाळा भरते का ? आणि तारेवर बसून झोके घेणाऱ्या या चिमण्या तेथे बाराखडी व उजळणी म्हणतात का ? आणि आमच्या शाळेला जशी सुट्टी असते तशीच त्यांना सुट्टी असते का? असा प्रश्न या तान्हुल्याला पडतो. तर भा. रा. तांबे यांच्या चिव चिव चिमणी या कवितेत, चिमणी एका आरशासमोर उभी राहून त्या आरशातील आपल्या पडछायेला आपली सवत मानून रागात त्या पडछायेवर चोच मारत असते. तेव्हा तिच्या सख्या तिला सांगतात.

पडेल खोच चोचीला चोचीला

काय होईल सवतिला सवतिला

अशा प्रकारे या चिऊताईवर अनेक कविता या आठवणीतील कवितांमध्ये आढळतात.

कोळ्याचा प्रयत्न या कवितेत एक छोटा कोळी उंच जागी जाळे विणतो व त्यावरून खाली पडतो तेव्हा तो पुन्हा चढतो व पुन्हा पडतो. शेवटी निकराने केलेल्या

प्रयत्नात त्याला यश येते व शेवटी तो जाळ्यात चढतो. थोडक्यात या कवितेचे सार असे की प्रयत्न कधी वाया जात नाही त्या प्रयत्नांना अखेर यश येते हे सांगताना कवी म्हणतात.

मग वेगे वेगे उठे । धागा चढु लागे नेटे ॥
बहु घेई खबरदारी । जाई, पोचे जाळ्या वेरी ॥
हळूच मग आत शिरे । पोटी आनंदाने भरे ॥
झटे निश्चयाचे बळे । अंती त्याला यश मिळे ॥

तर मधमाशी या कवितेत दिवसभर सतत थेंब थेंब मध मिळवणाऱ्या मधमाशीच्या कष्टांचे वर्णन केले आहे व तिच्या कडून माणसाने सुद्धा काही शिकावे असे सांगताना कवी म्हणतात,

थोडाही गुण मिळता घ्यावा
साठा त्याचा नित्य करावा
कोणालाही तो शिकवावा
ठेवा हे चित्ती ॥

उंटाची तक्रार या कवितेत उंट हा, सर्व प्राण्यांना वेग-वेगळ्या खुबी दिल्या आहेत पण मला मात्र कुणी विचारत नाही अशी तक्रार करतो तर, गाढवाचे गाणे यात कवी म्हणतात,

विणा घेवून बोकड बसला
पहा वाजवी माकड तबला

यांच्या प्रमाणेच, आजीचे घड्याळ, चेंडू, विमान, पोस्टमन यांच्यावर पण कविता आहे.

कवी भानुदास यांची आजारीपण ही कविता तर आठवणीतील कवितांची जननीच आहे. यात आजारी पडल्यामुळे कसे सर्वांकडून लाडु करून घेता येतील याचे सुंदर वर्णन केले आहे व शेवटी या कवितेत आजारी पडून दुःखी बसलेल्या लोकांना उद्देशून म्हणतात,

असले आजारीपण गोड
असूनी कण्हती का जनमूढ ?
हे मजला ऊकलेना गूढ।
म्हणून विचारी। मौज हीच वाटे भारी ॥

भा. रा. तांबे या बाळांनो या कवितेत लहान मुलांना जेथे झरे गाणे म्हणतात, फुलांचे मळे आहे, प्राणी आहेत अशा दुनियेत घेवून जातात. तर नारायण वामन टिळक माझी ताई या कवितेत ताईचे कौतुक करताना म्हणतात,

ताई, तू फुल गोड, ताई तू नक्षत्रचि माझे !
ताई तू रत्न गडे माझे !
ताई तू पाखरू गे माझे !
या सर्वाहून गोड गोड गे शील रुप तुझे
याची उपमा नच साचे ।

माधव ज्यूलियन यांच्या नवीन भाऊ या कवितेत नुकत्याच जन्मलेल्या बाळाचे अतिशय सुरेख वर्णन केले आहे. या काव्यात अतिशय सुंदर उपमांचा वापर करून या तान्हुल्याचे सुंदर वर्णन केले आहे. एके ठिकाणी कवी मऊमऊ गाल, छोटेसे नाक असलेल्या या बाळाचे वर्ण करताना म्हणतात,

का नको ग ? चुरुचुरु तान्हुला पितो,
बाजेवर पांघरुणामध्ये झोपतो
गाल किती मऊ, खातो काय ग हे साय ?
नाकावर दिला काय म्हशीने पाय ?

कवी भवानी शंकर पंडित यांच्या बाळाची बोली या काव्यात लहान बहीण आपल्या लहान भावाच्या बोबड्या बोलीबद्दल म्हणते,

आई ! आई ! बोलतो कसा हा आई !

म्हणतो मं मं भूक लागता

बा बा करतो पाणि मागता

म्हणतो दू दू दुधास बघता

हसतो ही ही ! बोलतो कसा हा आई !

अशा विविध बालकवितांचा समावेश आठवणींतील कविता यात केला गेला आहे. आजच्या नव्या पिढीतील लहान मुलांच्या दृष्टिकोनातून बघायचे झाले, तर असे दिसून येते, पूर्वीच्या काळी मुले ही आजकालच्या मुलांपेक्षा निसर्गाच्या अधिक जवळ होती. आज मुले निसर्गाच्या सानिध्यात नाहीत, असे नाही पण झपाट्याने होणारे औद्योगिकरण, संगणकाचे युग, या सर्व गोष्टींमध्ये काऊ-चिऊ च्या गोष्टी, पानाफुलाच्या गोष्टी आजीच्या गोष्टी, बालमनावर पूर्वी पेक्षा कमी प्रमाणात रुजवल्या जातात. एखाद्या मुलाला कविता म्हणून दाखव असं सांगितले तर तो एखाद्या सिनेनटाचं सुपरहिट गाणं अगदी हाव भावासहित नाच करून दाखवतो. पण यात त्या मुलाचा ही दोष नसतो. जे आजूबाजूला असेल त्याचा परिणाम कळत नकळत या बालमनावर होत असतो.

तसेच एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव असल्याने आपल्या बोबड्या आवाजात आजी-आजोबांजवळ गोष्टी, गाणी या करिता हट्ट करणारी नातवंडे फार कमी आढळून येतात. आई-वडिल दोघेही पैसे कमवण्यासाठी बाहेर, आजी-आजोबा गावाकडे, मुलं पाळणा घरात किंवा आजकालची बंद दारं असणारी फ्लॅट सिस्टीम या सर्वांमुळे लहान मुलं ही कळत नकळतच या गोष्टींपासून दूर ओढली जातात.

मुलांची खेळणी पाहिली तर रोबोट, रिमोट कंट्रोलवरच्या कार, बंदुका, पियानो अशी त्यामुळे कळत नकळत ही मुले या बालजगा पासून दूर रहातात. म्हणूनच ही बडबड गीते, किंवा बाल साहित्य जे आहे निश्चितच या बालमनावर निसर्ग प्रेमाने, तसेच मानव नाते संबंधाची ऊब रुजविण्यासाठी महत्त्वाचा ठेवा ठरतो.

## निसर्गाच्या कविता

सृष्टीचा नि कवीचा फार निकट संबंध ! कवीच्या काव्याला या सृष्टीचाच गंध असतो. त्याचे काव्य निसर्गाच्या प्रतिभेने नटलेले असते. अशाच सुंदर कविता आठवणींतील कविता या मध्ये आहेत.

आपल्या, 'आनंदी आनंद ' या कवितेत बालकवी म्हणतात. निसर्ग म्हणजे सृष्टीतील चमत्काराचे माहेर घर आणि एक एक पैलू हा विस्मयतेने नटलेला आहे. हा निसर्गातील आनंद व्यक्त करताना बालकवी म्हणतात.

सूर्य किरण सोनेरी हे । कौमुदी ही हसते आहे

खुलली संध्या प्रेमाने । आनंदे गीते गाणे.

रानात स्वच्छंदी हिंडणारे फुलपाखरू पाहून कवी केशवसुतांचे मन म्हणते,

जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे

गाणे मनात मग होय सवेचि जागे

कवी गणेश हरी पाटील याच फुलपाखरा विषयी म्हणतात,

फुलपाखरू

छान किती दिसते । फुलपाखरू

या वेलींवर फुलांबरोबर

गोड किती हसते । फुलपाखरू

श्रावण महिन्यातील सौंदर्य आपल्या शद्व सुमनात गुंफुन बालकवी म्हणतात,

श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे,

क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊनपडे

कवी माधव हे हिरवे तळकोकण यात कोकणातले सौंदर्य रेखाटताना म्हणतात,

सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळ कोकण,
राष्ट्रदेवीचे निसर्ग निर्मित केवळ नंदनवन ।

कवी श्री. बा. रानडे पावसाचे गाणे या गीतात म्हणतात,

पहा पाखरे-चरोनि होती झाडावर गोळा
कुठे बुडाला पलिकडील तो सोन्याचा गोळा ?

अस्ताला जाणाऱ्या सूर्यबिंबा विषयी आपल्या ' सूर्यास्त ' कवितेत कवी बा. खरे म्हणतात,

साम्राज्य भू-जलनिधीवर चालवून
अंधार जो रिपु तया दुरी घालवून
चंड प्रताप भगवान दिन-राज चाले
अस्ता-सवे किरण सेवकही निघाले.

केशवसुतांसारखे कवी,

सह्यगिरीच्या पायथ्याला सुपीक
रम्य खोरे कोकणामधी एक
नदी त्यामधूनी एक वाहताहे
एक खेडे तीवरी वसूनी राहे

असे एखाद्या खेड्याचे वर्णन करतात, तर कवी गं. मोगरे हे आपल्या सह्याद्री कवितेत कोठे दुर्गम उंच उंच शिखरी भेदोनी तारावया विंध्याद्री-व्रत आचरोनी उडवू पाहे रविच्या रथा, या शब्दांत सह्याद्रीचे वर्णन करतात. व सह्याद्री म्हणजे शौर्याचे प्रतीक असे सांगतात,

सृष्टीचे चमत्कार या काव्यात कवी म्हणतात.

नेमेचि येतो मग पावसाळा । हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा

नटलेल्या सृष्टीविषयी कवी ना. के बेहेरे म्हणतात,

रंग जांभळी कोणाचा ? रंग वांगणी वांग्याचा
रंग निळा आकाशात, हिरवा नांदे गवतात

असे रंगाचे वर्णन येते.

सरितेचे चरित्र सांगताना कवी यशवंत म्हणतात,

रांगत लोळत, दौडत घोळत
कडे कपारी तुनी खळाळत
आक्रमिते निज पंथ

रात्रं दिवस रणरणत्या वाळवंटातून वाहणाऱ्या सुवेज कालव्या विषयी कवी केशव कुमार म्हणतात,

हा सुवेझ कालवा
थक्क करील मानवा !

तर हिवाळ्याचे वर्णन करताना कवी अनिल म्हणतात,

चढली शिशिर ऋतुची कळा
आली सृष्टीवरी अवकळा

तर फुलबागांनी नटलेल्या या बागेचा नाद असणारे कवी माधवानज म्हणतात,

बाळपणी मज फुलझाडांचा नाद असे फार
केली होती मागील दारी बाग मजेदार.

जेव्हा ही बाग सोडून गेलेले कवी काही वर्षांनी परतात तेव्हा सुकलेली बाग पाहून म्हणतात,

अश्रुबिंदुही नेत्री नुरला, रडलो मी इतुका
सजीव नाही फिरूनी जाहली दुर्दैवी लतिका

लहान पणापासूनच सर्वांची ओळख लिंबोणीच्या झाडाशी होते. त्याच ह्याच झाडाविषयी श्री पाटणकर म्हणतात,

लिंबोणीच्या झाडा मागे

चांदोबाची कोर बाई

चंद्राबरोबर तारकांचा पण खेळ चालतो. ह्याच तारका बालकवींच्या गाण्यातून म्हणतात,

अनेक असले खेळ करू । प्रेमाच्या विश्वात भरू
सोडूनिया अपुले श्वास । जीवा नाचवु उल्हास
प्रभात काळी । नाम निराळी
होऊनिया आपण राहू । लोकांच्या मौजा पाहू

कवी आपल्या वारा व पाने या काव्यात म्हणतात,

शिशिर ऋतुचा स्वच्छंद वास आला
कर्णी पर्णाच्या लागूनी म्हणाला
माळरानावर दूर एक वेळा
चला माझ्यासह खेळ खेळण्याला

कवी खरे, आपल्या ' चंद्रोदय ' काव्यात म्हणतात,

लक्षावधी उगवती गगनात तारे
हे भालदार शशी-भूपतिचेच सारे
बुक्का-गुलाल उधळीतच मानपाने
चांदरात पसरिते पांढरी माय धरणीवर
लागली ओढ कशी अंतरी !

फुलराणी म्हणजे एक साधी भोळी, कुमारिका, की जी एकदा रविराजाच्या प्रेमात पडते. याचे वर्णन करताना कवी म्हणतात,

तो रविकर का गोजीरवाणा आवडला आमुच्या राणींना, लाजलाजली ह्या वचनांनी साधीभोळी ती फुलराणी रवी-राजाच्या प्रेमात पडते व सायंकाळ उलटून जेव्हा रात्र होऊ लागते तेव्हा सूर्य अस्ताला जातो, आकाशात ग्रहगोल जमा होऊ लागतात. तेव्हा मात्र फुलराणी बेचैन होते. फुलराणीच्या ह्या मनःस्थितीचे वर्णन करताना बालकवी म्हणतात,

या रजनिचे नेत्र खिलेल, नभी चमकती ते ग्रहगोल जादूटोणा त्यांनी केला, चैन पडेना फुलराणीला, निजली शेते निजली राने निजले प्राणी थोर लहान अजून जागी फुलराणी ही आज कशी ताळ्यावर नाही ?

अशा प्रकारे हे प्रेमकाव्य, अतिशय सुंदर शद्बात बालकवींनी फुलवले.

फुलांची विनंती यात कविवर्य कुसुमाग्रज म्हणतात,

फुलांचे वर्णन जितके करावे तितके कमीच म्हणुन,
आकाशात फुले, धरेवर फुले, वाऱ्यावरही फुले
माझ्या गेही फुले मनातही फुले भूगर्भिसारी फुले !!

रात्री निजून सकाळी उठून पंख फुटलेल्या ह्या कळ्या म्हणजेच जणू काही फुलपाखरे आहेत अशी कल्पना करत कवी अ. ज्ञा. पुराणिक फुलांभोवती पिंगा घालत फिरणाऱ्या फुलपाखरांविषयी म्हणतात,

उगाच धरिता त्यास कशाल ?
अपाय करिता मुक्या जीवाला ?
आवडेल का हे देवाला ?
ही देवाची मुले
फुलावर उडती फुलपाखरे !

अशा प्रकारे ह्या निसर्गाचे जेवढे वर्णन करू तेवढे थोडेच आहे. माणसाला जर ह्या निसर्गाशी समरस व्हायचे असेल तर त्याने ह्या धावपळीच्या जगात स्वतःभोवती जे कोश विणले आहे त्यातून नक्कीच बाहेर पडले पाहिजे हे सांगताना कवी भा. रा. तांबे म्हणतात,

(पान क्र. ४० वर)

# खूप सुट्यांमुळे देशाच्या प्रगतीत अडथळा निमार्ण होतो.

खूप सुट्या या प्रगतीच्या आड येतात. त्यामुळे कामाचे तास कमी होतात, व देशाचे नुकसान होते. तंत्रनिकेतनाच्या गतवर्षीच्या पॉलिझिन मधील एक पारितोषिक प्राप्त निबंध. - संपादक

धनुष्यापासून सुटलेला बाण, तोंडातून बाहेर पडलेला शब्द, बंदुकीतून सुटलेली गोळी आणि वाया गेलेला क्षण कधीच परत घेता येत नाही. कालचक्र हे सतत चालू असते. काळ हा कोणासाठी थांबत नाही. आपणास प्रगती करावयाची असेल तर काळाबरोबर पुढे गेले पाहिजे. या काळाचा उपयोग चांगल्या मार्गाने करणारा म्हणजे सदुपयोग करणारा चिरंतन सुखी बनतो.

आपल्या देशातील परिस्थितीनुसार अनुमान होते की, वर्षातील ३६५ दिवसांपैकी अर्ध्यापेक्षा जास्त काळ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये जातो. रविवारची सामुहिक सुट्टी असूनही त्यात क्रांतिकारक, समाजसेवक यांच्या जन्मतिथी पुण्यतिथीच्या नावाखाली सार्वजनिक सुट्ट्यांची भर पडते. हा वेळ वाया जातो. आराम करण्यात, वगैरे गोष्टीत हा वेळ व्यतीत केला जातो. अनेक ठिकाणी सुट्टी असल्याने सर्व काळ कारखाने, महाविद्यालये, कंपन्या बंद ठेवल्या जातात. काम पुढे ढकलले जाते. उत्पन्नाचे प्रमाण, उत्पादनाचे प्रमाण घटते. विद्यार्थी जीवनात वेळ ही अतिशय अमोलिक गोष्ट आहे. हा काळ त्यांनी ज्ञान संपादनात व्यतीत केला पाहिजे. परंतु तो सुट्यांमुळे वाया जातो.

खरं म्हटले तर या सुटयांची गरज आणीबाणीच्या काळात, अडचणीच्या वेळी असते परंतु जाहीर केल्या गेलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांमुळे काम करण्याची प्रेरणा असताना देखील हा वेळ वाया घालवला जातो. देशाची आर्थिक स्थिती पाहता अजूनही आपला देश अविकसनशील गटात मोडतो. जपानसारखा इवलासा देश जो दुसऱ्या महायुध्दात बेचिराख झाला आहे तोही आता विकसित देशांच्या पंगतीत जाऊन बसला आहे. परंतु जपानच्या दहापट मोठ्या आपल्या देशात स्वातंत्र्य मिळवून पन्नास वर्षे लोटली तरीही विकसित देशांच्या बरोबरीचा टप्पा गाठता आला नाही. याला कारण आहे - उद्योग प्रियता. देशाने स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण केली, देश नव्या शतकात पदार्पण करीत आहे.

इतर देशात दिलेल्या सुट्यांचा वापर तेथील लोक पूरक व्यवसायासाठी उपयोगी आणतात. त्यामुळे तेथील लोकांच्या जीवनातील अमूल्य वेळ वाया जात नाही. बाहेरच्या देशातील लोक कच्चा माल भारतातून विकत घेतात व तेथील पक्का माल भारतात विकतात. कच्चा माल तयार करण्यात वाचलेला वेळ आणि कच्च्या मालाच्या तुलनेत पक्क्या मालापासून मिळालेला नफा हेच त्यांच्या प्रगतीचे कारण आहे.

देशातील नागरिकांमध्ये या अमूल्य वेळाची जाणीव करून देण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. कबीरदासांची ' कल करे सो आज करे, और आज करे सो अब' ही शिकवण प्रसिध्द आहे. नेहरूंनी दिलेला आराम हराम हा उपदेश ही प्रसिद्ध आहे. परंतु उपदेश प्रसिद्ध असून काहीही उपयोग नाही.

देशातील लोक स्वतःला सूर्यवंशी म्हणवतात, परंतु सूर्य कधीही सुट्टी घेत नाही. सूर्य अखंड वर्षानुवर्षे त्याचे काम करत आला आहे. तर सूर्यवंशी म्हणणाऱ्या या लोकांना सुट्टीचा अधिकार दिला कोणी ? या सुट्टीच्या नावाखाली वाया गेलेला वेळ देशाच्या प्रगतीचा पाया

पोखरत आहे. जर याला विरोध झाला नाही तर देशाच्या प्रगतीचा डोंगर कोसळण्यात वेळ लागणार नाही. प्रगतीच्या या सूर्याला मावळू न देता त्याला आकाशात अग्रस्थान दिलेच पाहिजे आणि त्यासाठी या सार्वजनिक सुट्ट्यांना आळा घातलाच पाहिजे नाहीतर हा सुट्ट्यांच्या महाराक्षस प्रगतीच्या सूर्याला गिळून टाकण्यास वेळ लागणार नाही.

**श्रीकांत धनपुणे**

वि.प्र. तंत्रनिकेतन

ठाणे.

(पॉलिझिन मधून)

• • •

---

## भ्रष्टाचारापासून भारत मुक्त होईल का ?

> आमच्या संस्थेच्या तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांचा हा पारितोषिक प्राप्त निबंध. गेल्या वर्षीच्या पॉलिझिन मधून घेत आहोत. आजचा तरुण भ्रष्टाचाराबद्दल काय विचार करतो हे कळू शकते.- संपादक

भ्रष्टाचार ! भ्रष्ट असा आचार. ज्या आचाराने आपली जीवनमूल्ये भ्रष्ट होतात, तो भ्रष्टाचार. आपल्या भारतीय लोकांच्या शब्दकोशात गेल्या दोन तीन दशकांपासून हा शब्द अगदी कायमचे घर करून बसला आहे. आम्हा लोकांना या शब्दाची एवढी सवय झाली आहे, की, दिवसातून कमीत कमी दहाबारा वेळ तरी आमच्या मुखातून हा शब्द बोलला जातो. पण असे अचानक घडले तरी काय, की या संपूर्ण भारत देशाला या भ्रष्टाचाराची सवय झाली. या आधीच्या दोन पिढ्यांना हा शब्द माहीत नसावा.

१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. देशात नवीन उद्योगधंदे सुरू झाले. पूर्वीच्या बारा-बलुतेदारी पद्धतीचा ऱ्हास झाला आणि मजूर व मालकवर्ग असे दोन वर्ग उदयास आले. लोकांच्या हातात आता पैसा खेळू लागला. पण दिवसभर राबून या नोकर वर्गाच्या हातात कमी तर मालकवर्गाच्या हातात जास्त पैसा खेळू लागला. त्यामुळे साहजिकच अशा मालकवर्गाप्रमाणे सहजच झटपट श्रीमंत होण्याची आशा सर्वांच्या मनात जागृत झाली आणि यातूनच भ्रष्टाचार वाढू लागला.

या भ्रष्टाचाराचे देखील अनेक प्रकार आहेत. सामान्य माणसात केला जाणार सामान्य स्तरावरील भ्रष्टाचार, वरिष्ठ मंडळीत केला जाणारा वरिष्ठ भ्रष्टाचार, आपल्या नेतेमंडळींनी केलेला राजकीय भ्रष्टाचार आणि आपल्या आवडत्या जगातील म्हणजे क्रीडा जगातील लोकांनी आपल्याशी, खेळाच्या भावनेशी, संपूर्ण देशाशी केलेला हा भ्रष्टाचार. पण या सर्वांच्या या भ्रष्टाचाराच्या चक्रीत भरडला जातो तो मात्र तुमच्या आमच्या सारखा एक सामान्य माणूस.

सामान्य माणूस हा त्याच्या छोट्या छोट्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी या भ्रष्टाचाराला बळी पडतो. उदाहरण द्यायचे तर रेशन कार्ड पाहिजे, जातीचा दाखला पाहिजे, शाळेत अॅडमिशन पाहिजे अशा ठिकाणी त्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींकडून भ्रष्टाचार केला जातो. अहो एवढेच काय ही भ्रष्टाचारी माणसे मेलेल्या माणसाला देखील सुखाने मरू देत नाही. प्रथम स्मशानातील लाकडांसाठी स्मशानभूमीत भ्रष्टाचार. नंतर लवकरच मृत्यूचे प्रमाणपत्र (डेथ सर्टिफिकेट) पाहिजे म्हणून जन्म मृत्यू नोंदणी कार्यालयातील सरकारी भ्रष्टाचार, नंतर मृत व्यक्तीच्या नावे असलेली कागदपत्रे, संपत्ती आपल्या नावे करून घेण्यासाठी कोर्ट कचेऱ्यातील भ्रष्टाचार. अशा सार्वजनिक ठिकाणी आपल्याला नेहमी एक साम्य आढळते. कोठेतरी एका भिंतीवर लिहिलेले असते, भ्रष्टाचार हा एक दंडनीय गुन्हा आहे. पण त्या

भिंतीजवळच्या माणसाच्या टेबलाखालून हा भ्रष्टाचार अगदी सुरळितपणे पार पाडतो. या भ्रष्टाचाराची मर्यादा साधारणपणे पाच दहा रूपयांपासून ते अगदी वीस पंचवीस हजारापर्यंत असू शकतो.

दुसऱ्या प्रकारचा भ्रष्टाचार म्हणजे आपल्या नेहमी तोंडात असणार, वर्तमानपत्रात खमंगपणा आणण्यासाठी राजकारणी लोकांचा भ्रष्टाचार. या लोकांचा भ्रष्टाचार साधारणतः हल्लीच्या भाषेतील पेट्यांत मोजला जातो. एक पेटी म्हणजे काही लाख रूपये. हे लोक कोणाला सरकारी कामे द्यायची, आपल्या आवडत्या माणसांना सरकारी जागा, पेट्रोलपंप वाटायचे, जेथून जास्त कमिशन आपल्याला मिळेल अशा ठिकाणी सरकारी कामे द्यायची, अशा ठिकाणी अगदी भरपोस भ्रष्टाचार करतात. मग काही दिवसांनी वर्तमानपत्रात वाचायला मिळते अमुक अमुक नेत्याने ५० कोटींचा भ्रष्टाचार केला. कोणी चारा घोटाळा केला, तर कोणी हवाला रॅकेट केले. तर कोणी संरक्षण साहित्यात घोटाळा केला. आपल्या एका नेत्याने तर चक्क २५० कोटींचा चारा गडप केला होता. हर्षद मेहताने १५०० कोटींचा रोख्र खरेदी गैरव्यवहार करून बँकांच्या नाकी दम आणला. मध्यंतरी पेपरात वाचले की अनेक भारतीयांच्या स्वीस बँकेतील खात्यात कित्येक करोडो रूपये शिल्लक आहेत. हे सर्व वाचल्यावर मला एक प्रश्न पडतो, खरोखर आपला भारत देश एवढा श्रीमंत आहे ?

हल्ली एक नवीन भ्रष्टाचार उदयाला आला खेळाडूंचा भ्रष्टाचार. या भ्रष्टाचाराने भारतीय क्रिकेटची पाळेमुळे अगदी हलवून सोडली. पण लवकरच हा भ्रष्टाचार कळून आला आणि त्या खेळाडूंना शासन होऊन खेळाची लाज राखली गेली.

बस झाले हे भ्रष्टाचारपुराण. या भ्रष्टाचारी लोकांना अगदी कडक शासन केले पाहिजे. मग ते कोणीही असो. सामान्य माणूस वा राजकारणी असो किंवा खेळाडू असो.

पण खरोखरच एवढ्यानेच भारत भ्रष्टाचारापासून मुक्त होईल का ? नाही. यासाठी लोकांची मानसिकता बदलायला हवी. लोकांनी स्वतःहून भ्रष्टाचाराला खतपाणी घालायचे नाही.

हे सर्व करण्यानेच आपण या भारतभूमीला सर्वार्थाने पुण्यभूमी बनवू शकू. यासाठी आपण सर्व तरुण वर्गाने एकत्र येऊन, प्रयत्न करून टिळकांच्या, नेताजींच्या मनातील भारत घडवायला पाहिजे, मगच आपण अभिमानाने म्हणू शकू.

हम लोगोंको तुम जो कुछ समजलो जानी,<br>लेकिन फिर भी दिल है हिंदुस्थानी.

**योगेश रविंद्र लकेश्री**

वि.प्र. तंत्रनिकेतन, ठाणे. (पॉलिझिन मधून)

• • •

## आवड

एकदा एका मोठ्या पुढाऱ्याने वेड्यांच्या इस्पितळाला भेट दिली. तेथे एक वेडा शांतपणे आपले काम करीत होता. पुढाऱ्याने त्याला विचारले, " तू इथं कसा आलास ? "

वेडा म्हणाला, " मला चपलांपेक्षा बूटच आवडतात. "

पुढारी महाशयांना आश्चर्य वाटले. ते आपल्या बुटांकडे बघत म्हणाले, बस एवढेच कारण ? मला चपलांपेक्षा बूटच आवडतात.

'हो पण कसे तळून की उकडून ?' वेड्याने विचारले.

# शिक्षण व अध्यात्म

शिक्षणाचा अर्थ काय ? का शिकायचं ? शिक्षणामुळे मुक्ती मिळते या.... शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे असणाऱ्या शिक्षकाचे त्या दृष्टीने व्यक्त झालेले विचार. - संपादक

शाळा, महाविद्यालयातून पाठ्यपुस्तकांच्या आधारे जे शिकविले जाते ते शिक्षण, असा शिक्षणाचा संकुचित अर्थ केव्हाच इतिहास जमा झाला आहे. तसेच पूजा अर्चा, कर्मकांड, जपजाप्य, उपासतापास व तीर्थयात्रा म्हणजेच अध्यात्म हाही अध्यात्माचा फार संकुचित अर्थ आहे म्हणूनच शिक्षण व अध्यात्म यांचा अनोन्य संबंध जाणून शिक्षणाचा खरा अर्थ व अध्यात्माचा मार्ग शिक्षणावर कसा अवलंबून आहे हे समजून घ्यावयास हवे.

मन-मनगट आणि मेंदू यांना तालीम देते ते शिक्षण, जीवनाला वळण लावत ते शिक्षण, मनाची मशागत करून विशाल मन बनवतं ते शिक्षण. संस्कारातून व्यक्तिमत्त्व फुलवणं म्हणजे शिक्षण, स्पर्धेच्या युगात पाय रोवून उभ करण्यास सामर्थ देते ते शिक्षण, अशा शिक्षणाच्या अनेक लहान लहान पण अर्थपूर्ण व्याख्या करता येतात. या सर्वांचा हेतू एकच, माणसाला माणसाप्रमाणे जगण्यास शिकवावं, व उत्क्रांतीच्या अती वरच्या म्हणजे महामानव टप्प्यापर्यंत जाण्यास ताकद देणे.

वरील सर्व व्याख्यांचा विचार केला तर वर्गाच्या चार भिंतीत विद्यार्थ्यांला ठराविक तास मारूनमुटकून बसवून माहितीचा डोंगर त्याच्यापुढे उभे करणारे आजचे शिक्षण. विद्यार्थ्यांला व शिकवणाऱ्याला किती नीरस वाटत असेल याची कल्पना येऊ शकते.

मूल गर्भात असी तेव्हापासूनच त्याच्यावर संस्कार होऊ लागतात हे आता विज्ञानाने सिध्द करून दाखवले आहे. मूल जन्माला येते व कुटुंबात वाढू लागत तेव्हा ही ते संस्कार घेत असतं पण खऱ्या अर्थान संस्कार होण्याचे वय म्हणजे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा काळ.

यामुळेच या दोन्ही स्तरांवर शिक्षण घेताना (म्हणजेच देताना) विद्यार्थ्यांला अनेक शैक्षणिक प्रकल्प व संस्कारमय संधीचे प्रसंग द्यावे लागतात. चित्रकला, हस्तव्यवसाय, कार्यानुभव या सारखे विषय विद्यार्थ्यांच्या कलात्मक अविष्कारास वाव देतात. तर गणित व शास्त्र या विषयांच्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांला तर्क संगत विचार करणे आणि जिज्ञासा निर्माण करून घेणे या गोष्टी करता येतात. शारीरिक शिक्षण, खेळ-व्यायाम यातून शरीर घडावं ही अपेक्षा करणं, निरोगी शारीरिक मनच कार्यक्षमतेने काम करू शकते हा अनुभव देणं साधतयं. भाषा विषयांच्या अध्ययनातून रसिकता, सौदर्यदृष्टी, भाषा शैलीचा विकास व स्वतःत विचार करून मत व्यक्त करण्याची क्षमता यावी असा आग्रह असतो. शिक्षणातून हे सर्व व्हावं, साधावं हे जितक खर तितके हे आजच्या शिक्षण पध्दतीतून साधीं जात नाही हे एक कटु सत्य. अर्थात याचं महत्त्वाचं कारण, म्हणजे विद्यार्थी ज्ञानार्थी न राहता त्यास परीक्षार्थी बनवलं जातयं हेच होय.

विद्यार्थ्यात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, व्यक्तिमत्त्व त्यानं फुलवत न्याव आणि स्वतःचा शोध स्वतःमध्येच घेण्याची क्षमता त्यास मिळावी अस वाटत असेल तर चार भिंतीतील शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांच आयोजन शैक्षणिक कार्यात आवर्जून करावयास हवे. यासाठीच शैक्षणिक सहली, निसर्ग शिबिरे, शास्त्रमंडळ प्रदर्शने, स्नेहसंमेलने राष्ट्रीय सणांचे आयोजन या व अशा अनेक गोष्टी करता येतात.

वरील सर्व गोष्टींमागची खरी धडपड आहे ती माणसाच्या मनाची मशागत व्हावी यासाठी. कारण शिक्षण हा अध्यात्माचा पाया आहे व अध्यात्माची बैठक आहे. माणसाच्या मनःशक्तीवर या शक्तीच्या आधारेच माणूस अध्यत्माच्या क्षेत्रात वरच्या टप्प्यापर्यंत जाऊ शकतो.

माणसाच्या जीवनात मनाचे महत्त्व किती आहे याचे मोठे सुरस वर्णन नाथभागवता मधील भिक्षुगीतामध्ये आढळते. श्री एकनाथ थोडक्यात असे सांगतात की,

१) " या मनाने सर्वांना आपल्या आधीन केलेले आहे परंतु मन मात्र कुणालाच आवरत नाही." २) देवांना देखील जिंकण्यास कठीण असणाऱ्या मनाला कोण आवरणार. ३) मन हे इंद्रियांचा राजा आहे. ४) मन हे बलाढ्यातील बलाढ्य आहे. ५) त्याला स्वाधीन करणे मोठ मोठ्यांना साधत नाही. ६) काळ आपल्या सामर्थ्याने सर्वांना ग्रासतो पण मनापुढे तो नामोहरम होतो. ७) मन काळाला आटोक्यात नाही. ८) मनाला दुखणे होत नाही. ९) मन रोडावेल असा रोग नाही. १०) मन कल्पनेने त्रैलोक्याला नाचवते. ११) मनाला जिंकील असा पराक्रमी कोण आहे ? १२) पण मनाचा एक उत्तम गुण असा की ते जर स्वतः परमार्थाकडे (अध्यात्माकडे) लागले तर चारी मुक्तींना आपली दासी करून ठेवते. १३) परब्रह्म बांधून हाती देते. १४) मनच मनाचे साधक आणि बाधक आहे. १५) त्या मनाला कसे स्वाधीन करावे हे प्रत्येकाने समजून घ्यावयास हवे.

अध्यात्माचा व मनाचा हा जो संबंध आहे तो संवर्धन करण्याचे काम शिक्षणाचे आहे. शिक्षणातून माणूस हा बुद्धीचा विकास करून घेतो व ज्ञानाची भूक भागवतो पण स्वतःचा शोध स्वतः घेण्याची क्षमता येण्यासाठी मनाला अधिन करण्याची कला शिक्षणातून विकसित व्हावयास हवी.

ज्ञानाची पहिली पायरी आहे. सामान्य ज्ञान. ज्ञानाची दुसरी पायरी आहे विज्ञान. ज्ञानाची तिसरी पायरी आहे तत्वज्ञान. ज्ञानाची चौथी पायरी आहे स्वतःचे ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान.

प्रचलित शिक्षणातून माणूस ज्ञानाच्या वरील तीन पायऱ्या पर्यंत पोचू शकतो पण मनावर संस्कार करणारे शिक्षण मिळाले असेल तरच माणूस ज्ञानाच्या चौथ्या पायरीवर जाऊ शकतो कारण ज्ञानाच्या चौथ्या पायरीवर जाणे येथे अध्यात्माची खरी सुरुवात आहे.

माणसाच्या शरीरामध्ये आणि अंतःकरणामध्ये अनेक घटना घडतात त्यांच्याकडे वेगळेपणाने पहावे (साक्षीदार) आणि वस्तुस्थितीचा अभ्यास करून तिचा उलगडा करून घ्यावा यासच स्वतःचे ज्ञान म्हणतात. स्वतःच्या देहाकडे आणि अंतकरणाकडे वेगळेपणाने पाहण्याची सूक्ष्म कला माणसाला साध्य होऊ शकते. अंतःकरणाच्या हालचालींचे नियम कळून घेऊन त्याच्यावर ताबा आणता येतो. त्यातूनच अंतःकरणात दिव्य बदल घडवून आणणे हे आत्मज्ञानाचे पर्यवसान आहे.

अंतःकरणात क्रान्ती घडली की माणसाला अनंताचा स्पर्श होतो. माणूस जाणीवेच्या परमोच्च पायरीवर चढून केवळ साक्षीरूप दृष्टा होतो तो पूर्ण समाधानी पावतो आणि जगाला समाधानाचा निश्चित मार्ग दाखवू शकतो.

आध्यात्मिक मनोवृत्ती किंवा जीवनाचा खरा अर्थ जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येक व्यक्तीत असतेच पण आजचे शिक्षण त्याला त्या दिशेपर्यंत पोचवू शकत नाही हे दुर्दैव आहे. म्हणूनच शिक्षण व अध्यात्म किंवा शिक्षणाचे अध्यात्म किंवा अध्यात्मास शिक्षणाची जरूरी अशा कोणत्याही दृष्टीने विचार केला तर मानवाचे पूर्ण उत्क्रांत स्वरूप हेच अध्यात्माचे ध्येय आहे. जर अध्यात्मापर्यंत घेऊन जाणे हे शिक्षणाचे ध्येय असेल तर शिक्षण व अध्यात्म यांचा वेगवेगळा विचारच करता येऊ शकत नाही. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे जाणून त्या मार्गाने वाटचाल व्हावयास हवी. तरच समर्थांच्या दासबोधातील उत्तम गुण असलेला मानव पहावयास मिळेल आणि याची देही याची डोळा मुक्तीचा अनुभव घेणे प्रत्येकास शक्य होईल.

**श्री. अ. वि. सहस्त्रबुध्दे**
माजी मुख्या. (डॉ. बेडेकर विद्या मंदिर)

• • •

# "कठउपनिषद अर्थात नचिकेत आख्यान"

गीता कुलकर्णी यांना अलीकडेच तत्त्वज्ञानातील पीएच्.डी. पदवी मिळाली आहे. दिशाच्या त्या नियमित वाचक आहेत. त्यांचा या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाची पदवी प्राप्त केल्यावरल त्यांचे हार्दिक अभिनंदन.
- संपादक

उपनिषदांचे ज्ञान गुरुजवळ बसून, शंका निरसन करुन आले आहे. हे ज्ञान त्या वेळच्या पद्धती प्रमाणे तोंडी पाठांतराने आलेले आहे. त्याला एक पद्धत आहे ती म्हणजे प्रथम उपनिषदाचे नाव 'कठ उपनिषद' नंतर ते उपनिषद कुठल्या वेद शाखेतील आहे व गान / पद्य पद्धतीत आहे. हे यजुर्वेद शाखेत का आहे ह्याचे कारण देताना मॅक्स मुलर म्हणतात 'नचिकेत आख्यामेह तैत्तिरीय ' यजुर्वेदाच्या ब्राह्मण ग्रंथात येते. (III. 1-8) संदर्भ : The Sacred books of the East Vol. XV Motilal Banaradas, Delhi, 1975, P.XXI.

हे उपनिषद संवादाच्या रुपाने आपल्या समोर येते. ह्यात पहिल्यांदा वाजस्रवस व नचिकेत यांचा संवाद आहे. (वाजस्रवस हे नचिकेताच्या वडिलांचे नाव आहे) नंतर नचिकेत व यमाचा संवाद आहे.

वाजस्रवस दान धर्म करत असताना मरतुकड्या गाई दान करतात व हे नचिकेत बघतो व वडिलांना सांगतो की, अशा गाई दान करुन तुम्हांला पुण्य मिळणार नाही. अशा गाई दान करु नका. पण वडिल ऐकत तर नाहीतच उलट नचिकेतलाच शाप देतात व मी तुला यमाला देऊन टाकले आहे असे म्हणतात. नचिकेत यमलोकी येतो. यमाला तीन प्रश्न विचारतो. हे तीन प्रश्न म्हणजेच कठ उपनिषद वा नचिकेत आख्यान होय.

हे तीन प्रश्न म्हणजे (१) भगवंताचे स्वरुप कसे आहे ? (२) मरणानंतर आत्मा कुठे जातो ? त्याची स्थिति काय होते ? (३) अमरत्व प्राप्तीसाठी माणसाने काय करावयास पाहिजे.

मला सर्वात आश्चर्य वाटते की, नचिकेतला वडिलांच्या क्रोधामुळे शाप मिळाला, पण तरीही न घाबरता त्याने धैर्याने तोंड दिले, पण आपले खरे म्हणणे सोडले नाही. हा सत्यवादी पणाच त्याला यमाच्या द्वारातून सोडवितो. आजच्या तरुणांना नचिकेत नक्कीच मार्गदर्शक ठरु शकतो. यमाकडे प्रथम तो वडिलांचा माझ्यावरचा राग दूर होऊ दे असाच वर मागतो. ह्यात त्याची कर्तव्य निष्ठा मला दिसते.

यमाला आत्म्याच्या स्थिती बद्दल प्रश्न विचारल्यानंतर यम नचिकेतला खूप प्रलोभने दाखवितो. 'मी तुला भरपूर संपत्ती देतो, गाई-गुरे देतो, मुले-बाळे, भरपूर आयुष्य देतो वगैरे. पण तू हे प्रश्न विचारु नकोस.'' पण नचिकेत वरील सर्व गोष्टी त्याज्य व नाशवंत आहेत हे समजून आपल्या प्रश्नांचीच उत्तरे पाहिजेत असे यमाला सांगतो. नचिकेताने देहाची नश्वरता व संपत्तीचा नाश व ती येथेच ठेवावी लागते हे जाणून त्रिकालाबाधीत सत्य यमाकडून जाणून घेतले. ईश्वराचे स्वरुप हे सत् चित् आनंद मय असेच आहे व आत्माही सत् चित् आनंद असाच आहे. आत्मा आपल्या शरीरात येऊन राहिल्यामुळे आपले मूळ स्वरुप विसरुन सुखदु:खाच्या भोवऱ्यात अडकला. यम सांगतो, माणसाने श्रेयस (चांगले) व प्रेयस (सुखकारक) ह्यातील श्रेयसासाठी प्रयत्न करावा. कारण श्रेयस माणसाला

जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकविते. विद्या म्हणजेच ईश्वराचे ज्ञान व अविद्या म्हणजे भौतिक ज्ञान ह्या दोहोंचा समन्वय साधून श्रेयसाकडे जायचे असे यम नचिकेतला सांगतो व त्यातूनच ईश्वरप्राप्ती वा मोक्ष मिळेल. हे ह्या उपनिषदाचे सार आहे.

हल्लीच्या विज्ञानाच्या युगात सुद्धा माणूस सर्व सोयी असुन सुद्धा दुःखी आहे, भीती आहे. कारण शाश्वत काय आहे व अशाश्वत काय आहे याचा नीट विचार करत नाही. ईश्वराचे जग आहे व आपण सर्वजण त्याने नेमून दिलेले काम करत आहे ही भावना माणसाला अहंकारापासून दूर ठेवण्यास मदत करते. ईश्वराचे व आत्म्याचे अस्तित्व माणसाला सुखापेक्षा अधिक चांगल्या मार्गाला जाण्यास प्रवृत्त करते. मोक्ष/आत्मसाक्षात्कार आत्म्याचे स्वरुप हे माणसाला सुखापेक्षा अधिक चांगले काम करण्यास प्रवृत्त करतात. उपनिषदकारांनी आपल्याला चांगले काम करत, ईश्वराचे अधिष्ठान ठेऊन काम करत शंभर वर्षे जगा अशी आज्ञा केली आहे. त्यासाठी एकमेकांवर विश्वास, बंधुभाव, प्रेम हे आवश्यक आहे. 'वसुधैव कुटुम्बकम्' ही उक्ती कृतीत आणण्यासाठी आपले वेद, उपनिषदे, गीता साहाय्यक ठरतात. नचिकेताचे प्रश्न प्रेयसाकडून श्रेयसाकडे माणसाला नक्की नेतील.

**डॉ. सौ. गीता कुलकर्णी**

अ-३०६, मित्री अपार्ट., वेस्टर्न एक्प्रेस हायवेजवळ,

अंधेरी (पूर्व) ४०० ०६९.

फोन : ८२४१९००

• • •

## विदान महाविद्यालय ग्रंथालय

बांदोडकर विदान महाविद्यालयाच्या ग्रंथालयास दरवर्षी डॉ. व्ही. टी. टंगळखवीकर यांनी कै. आश्विनीच्या स्मरणार्थ व श्री. गोविंद साठे यांनी कै. शुभांगीच्या स्मरणार्थ ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेच्या व्याजातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील, व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोगी ठरतील, त्यांच्या वाचन संदर्भांचा विकास करू शकतील अशी उत्तमोत्तम पुस्तके घेतली जातात. यात संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंत, चरित्रांपासून ते शब्द कोशांपर्यंचे विविध साहित्य घेतलेले आहे.



# परिसर वार्ता

दिवाळीच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर २६ नोव्हेंबर रोजी महाविद्यालय परिसर पुन्हा विद्यार्थ्यांच्या गर्दीने फुलून आला. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायन शास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक व प्रपाठक डॉ. सु. प्र. कुलकर्णी ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त झाले. संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील व सहकारी प्राध्यापकांच्या प्रयत्नांनी महाविद्यालयातून सेवा निवृत्त होणाऱ्यांना निरोप देण्याची व त्या प्रीत्यर्थ समारंभ घेण्याची प्रथा परत सुरू झाली. कार्यालयातील ज्येष्ठ लेखापाल श्रीराम जाधव यांनाही निरोप देण्यासाठी समारंभ आयोजित केला गेला होता. डॉ. एस. पी. हे कुलकर्णी सरांचे नाव महाविद्यालयात अधिक परिचित आहे. यांच्या सन्मानार्थ २९ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या वाचनालय कक्षा अनौपचारिक समारंभ संपन्न झाला.

या समारंभाचे खास वैशिष्ट म्हणजे विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष, ऋषितुल्य डॉ. वा. ना बेडेकर स्वतः उपस्थित होते. २९ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त होणाऱ्या डॉ. एस्. पी. बद्दल रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी. सारंग, गणित विभाग प्रमुख प्रा. आर. एस्. पोद्दार, ग्रंथालय विभाग प्रमुख म्हणून मी स्वतः, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दिक्षित, प्राणिशास्त्र विभागप्रमुख व पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, प्राचार्य व्ही. पी. पाटील यांची भाषणे झाली. डॉ. वा. ना बेडेकरांनी, एस्. पी. निवृत्त झाले तरी त्यांनी महाविद्यालयात यावे, आपल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांनी लाभ करून घ्यावा असे उद्गार काढले. या प्रसंगी सौ. उल्का कुलकर्णी ही उपस्थित होत्या.

डॉ. एस्. पी. यांनी आपल्या गौरवाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. अशोक पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पदार्थ विज्ञान विभागातील प्रा. दिनकर चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले.

## सुप्रिया भदाणे

वनस्पतिशास्त्रातील प्राध्यापक व प्रपाठक, डॉ नागेश टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाने निष्णात परीक्षेची तयारी करणारी सौ. सुप्रिया भदाणे हि आमच्या महाविद्यालयाची जुनी विद्यार्थिनी. अपारंपारिक पालेभाज्या विषयावर ती संशोधन करीत आहे. मधुमेह व अपारंपरिक पालेभाज्या यांच्यातील लिंक शोधणे हा तिचा उद्देश आहे.

या शिवाय मुंबईतील प्रख्यात एंडोक्रायनॉलॉजिस्ट डॉ. शशांक जोशी यांच्या अनेक प्रकल्पावर तिचे संशोधन चालू आहे. अशाच एका संशोधन प्रकल्पावर संदर्भात १९ ते २५ आक्टोबर दरम्यान सिंगापूर येथे झालेल्या एका परिषदेत तिचा सहभाग होता. याच विषयात पी. एच. डी. करण्याचा मानस आहे.

याचबरोबर डायबेटॉलॉजी या विषयातील पदव्युत्तर झाल्यानंतरच्या संशोधकांसाठी असणारा एक अभ्यासक्रमही तिने पूर्ण केला.

सुप्रियाचे दिशातर्फे अभिनंदन !

## राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने आगळे वेगळे प्रदर्शन

राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने कळव्यातील जवाहर वाचनालयात ग्रंथालय सेवा समूहातर्फे आयोजित करण्यात आलेल्या प्रकल्प व संदर्भ ग्रंथांच्या प्रदर्शनाचे कीर्ती महाविद्यालयातील निवृत्त प्रा. सुभाष सोमण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. बांदोडकर विज्ञान

महाविद्यालयातील यशवंतराव महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या गेल्या दोन वर्षातील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या निवडक ४५ प्रकल्पांचे हे प्रदर्शन भरविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील व ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. ग्रंथालय सेवा समूहातील याच वर्गातील विद्यार्थी श्री. सुधाकर फडके, श्री. सुनील पवार, दीपाली सुरते, पल्लवी तडस तसेच वाचनालयातील सेवक श्री. उपाध्ये यांनी प्रदर्शन आयोजनासाठी विशेष कष्ट घेतले.



प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना प्रा. सुभाष सोमण

उद्‌घाटन प्रसंगी वाचनालयाच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष श्री. सुभाष पाटील, कार्यवाह श्री. रमेश पाटील, प्रा. मोहन पाठक आदी मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनात प्रा. प्रवीण दवणे यांच्या साहित्याची सूची, चरित्र आत्मचरित्रांची सूची, दुर्मिळ नाटकांची सूची, निरंजन उजगरे यांच्या रुपांतरित कवितांची चरण सूची, दैनिक सन्मित्र मधील लेखांच्या सूची या बरोबरच कारगिल, काश्मिर समस्या, बोफोर्स आदी विषयांवरील कात्रणांचे प्रकल्प होते. तसेच वाचनालयाच्या संदर्भ विभागातील विश्वकोश, वार्षिक संदर्भ ग्रंथ, शब्दकोश वाचकांसाठी ठेवण्यात आले होते. प्रसिध्द चित्रकार श्री. संजय रुळे यांनी काढलेली संस्कार भारतीची रांगोळी हे प्रदर्शनाचे विशेष आकर्षण होते.

दोन दिवसांच्या या प्रदर्शनास अनेक विद्यार्थी तसेच अन्य वाचक यांनी भेट देऊन या उपक्रमासाठी ग्रंथालय सेवासमूह, जवाहर वाचनालय व बांदोडकर महाविद्यालय यांचे विशेष अभिनंदन केले.

**जोशी बेडेकर महाविद्यालयाला बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक :**

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या सिनियर संघाने नुकत्याच पार पडलेल्या मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटनस्पर्धेत सुवर्णपदकासह अजिंक्यपद पटकावले आहे !

या स्पर्धा युनिव्हर्सिटी स्पोटर्स पॅव्हेलीयन, मरीन लाईन्स येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. ठाणे महाविद्यालयाच्या संघात पुढील खेळाडूंचा समावेश होता.

आशिश भिडे (कर्णधार), अमर मोहिते, अक्षय ठक्कर, मेटिक गोन्हालसवीस, निखिल कोल्हटकर, नेहा वाड, सपना देसाई.

उपांत्यपूर्व फेरीत या संघाने एस.आय.ई.एस. कॉलेजचा २-० असा पराभव केला व उपांत्य फेरीत एन. एम. महाविद्यालय, यांचाही सरळ २-० अशा लढतीत पराभव केला. अंतिम फेरीची लढत अतिशय चुरशीची झाली व त्या लढतीमध्ये अंधेरीच्या एच.आर. कॉमर्स महाविद्यालयाचा पुन्हा एकवार २-० असा सरळ गेम्समध्ये पराभव करीत जोशी बांदोडकर महाविद्यालयाला अजिंक्यपद मिळवून दिले; ते त्यांचे आघाडीचे खेळाडू अमर मोहिते व अक्षय ठक्कर यांनी !

या संघाचे प्रशिक्षक श्री. श्रीकांत वाड हे होते. ठाणे महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एस. डब्ल्यू. गोखले यांच्या उत्तेजनामुळे व सहकार्यामुळे व मार्गदर्शनामुळेच हे खेळाडू या स्पर्धेत तसेच इतर अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशस्वी होतात व भाग घेऊ शकतात याचा खास उल्लेख श्री. श्रीकांत वाड यांनी केला.

प्राचार्य श्री.गोखले यांनी सदर संघाचा खास सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. धोपेश्वरकर, क्रीडा शिक्षक श्री. मोरे, प्रा. अदिल भावड, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे इत्यादी उपस्थित होते.

हे सारे खेळाडू ठाणे महापालिकेच्या सय्यद मोदी बॅडमिंटन प्रशिक्षण योजनेचे प्रशिक्षार्थी असून ह्या योजनेत ते खंडू रांगणेकर बॅडमिंटन हॉलमधे रोज सकाळी ८.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत कसून सराव करतात. त्यांना दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहाचे व्यवस्थापक श्री. धनावडे यांचेही सहकार्य लाभत असते.

तसेच याच महापालिका प्रशिक्षण योजनेतील एक गुणवान बॅडमिंटनपटू सुमेध देवरुखकर याने या स्पर्धेत पुरुष एकेरीचेही सुवर्णपदक पटकावले. ठाणे महाविद्यालयाचे गेल्या दशकभरातील १० आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधे ८ सांघिक अजिंक्य पदे पटकावून नवा इतिहास घडवला आहे.

**प्रा. मोहन पाठक**

• • •

(पान क्र. ३० वरून)

**आठवणीतील कवितांच्या आठवणी**

घनी तमी शुक्र बघ राज्य करी !
रे खिन्न मना, बघ जरा तरी !
का गुदमरशी आत कुढुनी ?
रे ! मारी भरारी जरा वरी

खरंच हा निसर्ग किती परोपकारी आहे. अनंत हस्ते कमलावराने तो माणसाला सर्व काही देतो. कविता वाचून असे वाटते की आज माणसाने निसर्गावर जे आक्रमण केले आहे व त्याची तो जी हानी करतो आहे, त्याचे परिणाम पुन्हा माणसालाच भोगावे लागणार आहेत. विख्यात शास्त्रज्ञ न्यूटन ने म्हणलेच आहे की For every action there is equal and opposite reaction. या नियमाला अनुसरून माणूस निसर्गाची जेवढी हानी करत आहे तेवढीच तीव्र निसर्गाची पण प्रतिक्रीय होईल व हा शांत, सुंदर, उदात्त निसर्ग आपले रौद्र रुप कधी भूकंपाच्या रुपात, तर कधी ज्वालामुखी महापूर, कोरडा दुष्काळ ह्या स्वरुपात दाखवतो म्हणून माणसाने निसर्ग हा वाचायला हवा. कधी झाडे लावून तर कधी प्रदूषण टाळून.

**संदर्भ :-**

**प्रस्तावना :**

१) आठवणीतल्या कविता. भाग १,२,३,४.

**कु. क्षमा गो. वैद्य,**
आनंद-सरीता कॉ. हौ. सोसायटी, तळ मजला,
नागरिक स्टोअर्स मागे, राबोला शंकर रोड,
चेंदणी, ठाणे(प) - ४०० ६०१
दूरध्वनी क्रमांक : ५३३ ३०८०.

• • •